सुवर्णमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

स्थापना : १९६४

# मासिक नवस्नेह

**ब्रह्मतेजो बलंबलम्**

वर्ष ८ वे : अंक ७

ऑक्टोबर २०२२

स्वागतमूल्य
₹. 30/-




प्रेषक

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ,
मंगळवार पेठ, कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१–२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

।। श्री परशुराम प्रसन्न ।।

# कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर

**428, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,**
**कोल्हापूर-416 012 फोन नं. 0231-2546225, 2991673, 7620546225**

आता कोल्हापूर चित्पावन संघाच्या नवीन वेबसाईटवर घरबसल्या सर्व ब्राह्मण पोटशाखेतील विवाहेच्छू तरुण तरुणींसाठी हजारो स्थळे पाहून आपल्या अनुरूप जोडीदाराची निवड करता येणार ! सर्व ब्राह्मण वधुवरांसाठी ही मोठी सुवर्णसंधीच म्हणावी लागेल!

- देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे, कण्व, सारस्वत, देवरुखे, दैवज्ञ इ. सर्व ब्राह्मण पोटशाखांतील वधुवरांसहित मराठी, गुजराथी, कानडी व परप्रांतीय फक्त ब्राह्मण वधुवरांची घरबसल्या केव्हाही, कधीही आणि कितीही स्थळे पहाण्याची सोय !
- मोबाईलवर अधिकृत ॲपद्वारा वेबसाईट पाहण्याची सोय !
- अत्यंत गोपनीय व सुरक्षित वेबसाईट, सहज सोप्या पद्धतीने फॉर्म भरण्याची सुविधा !
- केवळ स्थानिकच नव्हे, तर संपूर्ण देशातील आणि जगभरातील ब्राह्मण वधुवरांची नोंदणीकृत स्थळांची माहिती उपलब्ध !
- आकर्षक तीन सवलत योजनेत विवाहेच्छूंसाठी ही पॅकेज उपलब्ध आहेत.

१) **श्री परशुराम पॅकेज :- स्वागत शुल्क रु. २,०००/- (एक वर्षासाठी)**
या पॅकेजमध्ये तुम्हाला एक वर्ष ऑफलाईन व एक वर्ष इंटरनेट नोंदणी मिळेल. यामध्ये वर्षभरात नोंदणी होणाऱ्या सर्व स्थळांची माहिती व संपर्क क्रमांक मिळतील. तसेच पसंतीच्या स्थळांना एस.एम.एस. पाठवण्याची व 'चॅट' ची सुविधा मिळेल. आपले १० फोटो अपलोट करण्याची सुविधा शिवाय संस्थेच्या 'नवस्नेह' मासिकांत आपल्या स्थळाची माहिती एकदा प्रसिद्ध केली जाईल. याचबरोबर पंचरत्न वधूवर सूचक केंद्राकडून pancharatnavivah.co.in या वेबसाईटमधील १०० स्थळे सहा महिने मुदतीत मोफत पहायला मिळतील. (अधिक माहितीसाठी संपर्क : 9881291863)

२) **श्री योगेश्वरी पॅकेज :- स्वागत शुल्क रु. १,५००/- (सहा महिन्यांसाठी)**
या पॅकेजमध्ये तुम्हाला सहा महिने इंटरनेट नोंदणी मिळेल. त्याचबरोबर या पॅकेजमध्ये तुम्हाला १२५ स्थळांची माहिती व संपर्क क्रमांक मिळतील. पसंतीच्या स्थळांना एस.एम.एस. पाठवण्याची व 'चॅट'ची सुविधाही तुम्हाला मिळेल. आपले १० फोटो अपलोड करण्याची सुविधाही यामध्ये आहे.

३) **श्री महालक्ष्मी पॅकेज :- स्वागत शुल्क रु. १,०००/- (तीन महिन्यांसाठी)**
यामध्ये नोंदणी करणाऱ्यांना तीन महिने इंटरनेट नोंदणी उपलब्ध असेल. ५० स्थळांचे संपर्क क्रमांक व माहिती मिळू शकेल. पसंतीच्या स्थळांना एस.एम.एस. व 'चॅटींग' सुविधा तसेच आपले किमान १० फोटो अपलोड करता येण्याची सुविधाही या पॅकेजमध्ये देण्यात आली आहे.

उपवर ब्राह्मण तरुण तरुणींनी आजच नोंदणी करून या सवलतीच्या पॅकेजचा लाभ घ्यावा. आमच्या माध्यमातून आपला विवाह लौकरच संपन्न व्हावा या शुभेच्छा !

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष ८ वे : अंक ७ : ऑक्टोबर २०२२**






सुवर्णमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५



- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** श्री. पुष्कर ताम्हनकर 9890737221
  सौ. पल्लवी देशमुख 9420455984


### अनुक्रम


१) **संपादकीय** /४
२) **लौकिक दंतकथांचे वास्तव** /५
   - सुधीर दाजी जोशी
३) **छत्रपती शिवरायांचे अष्टप्रधान मंडळ** /९
   - गुरुप्रसाद कानिटकर
४) **जाहिरातबाजी की वास्तव** /११
   - कौस्तुभ ताम्हनकर
५) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'** / १२
   - सौ. मंजुश्री गोखले
६) **ज्ञानसूर्याची सावली** /१४ - सौ. मंजुश्री गोखले
   **आजरा आंबोली वर्षा सहल**/१६
   - डॉ. सुस्मिता गाडगीळ
७) **मेंदूच्या कार्यपद्धती समजून मेंदूच्या विकासाकडे वाटचाल** / १८ - इंद्राणी केळकर
८) **ब्राह्मण समाज अभिमानास्पद व्यक्ती गौरव** /२३
९) **वधूवर माहिती यादी** /२५



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स,
  १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर.
  मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे
  विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस,
  कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०



- **संचालक मंडळ**

**श्री. सदानंद दिनकर मराठे** (अध्यक्ष)
0231-2541823
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष)
9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह)
7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह)
9881077513
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार)
8149480034

- **संचालक**

सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. विठ्ठल गणेश नरवणे 9765971524
श्री. मकरंद विष्णू करंदीकर 9421113005
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380

- **सल्लागार**


श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडीलकर 9422046611


**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६**
**(साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.



**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. ८ वर दिली आहे.**

# संपादकीय... 

नमस्कार मंडळी,

धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले,**
मोबा. ८८०५३५५२००

# लौकिक दंतकथांचे वास्तव

## (लेखांक सातवे)

मानवाच्या प्रगतीच्या काळामध्ये सर्वप्रथम त्याला सूर्याचे महत्व समजले. तो सूर्याला देव मानून त्याची पूजा करू लागला. रात्री अंधारात सूर्य नसतो तेव्हा चंद्राचा प्रकाश त्याला आश्वस्त करत असल्याने त्याने चंद्राचीही पूजा सुरू केली. चंद्राच्या कला हळूहळू त्याच्या लक्षात येऊ लागल्या. तो क्षीण होतो, तसाच वृद्धिंगतही होतो, एके दिवशी महिन्यातून पूर्ण दिसतो, तर एके दिवशी गायब होतो. त्या घटनांचा कल त्याच्या लक्षात येऊ लागला. चंद्राकडे आपण पाहू शकतो, पण सूर्याकडे नजर लावता येत नाही हे त्याला उमगले. त्यामुळे त्याने सूर्याला पुजले तर चंद्राशी मामाचे नाते जोडले. या चंद्रावरील डागांसंबंधी अनेक समजूती प्रचलित आहेत. हा डाग म्हणजे एक रथ आहे. चंद्राने बृहस्पतीच्या पत्नीस भ्रष्ट केल्यामुळे त्याच्या कीर्तिस जो कलंक लागला त्याचे हे चिन्ह आहे. हा डाग म्हणजे एक चिंचेचे झाड आहे. त्यात तो राहतो. काही जण त्यास रथाला जोडलेल्या हरिणाची पडछाया मानतात. कित्येकांच्या मते ते डाग नलराजाच्या घोड्याचा खूर चंद्राला लागल्यामुळे पडले आहेत असे आहे. पिंपळ वृक्षाचा हा डाग असून त्याला एक गाय व दोन हरिणे बांधली आहेत. चंद्राने आपल्या शरीरातील सत्व काढून मदनाची उत्पत्ती केल्याने त्याच्या अंगावर डाग पडले अशीही समजूत आहे; तर यशोदेने कृष्णाच्या अंगावरून मृत्तिकापात्र ओवाळून आकाशात फेकून दिले, ते चंद्राला लागल्याने हा डाग निर्माण झाल्याचे काही जण मानतात. अर्थातच हे सर्व भास आहेत. चंद्राकडे आपल्याला एकटक पाहता येते. तो लांब असलेने तेथे दिसणाऱ्या आकृत्यांचे ज्याच्या त्याच्या मतीप्रमाणे ज्याने त्याने अर्थ लावले. आता मानवाने चंद्राच्या भूमीवर पाऊल ठेवल्याने त्याचे हे सर्व भ्रम दूर झाले आहेत. आपल्याला दिसणारे हे डाग तिथल्या भूमीवरच्या डोंगर-दऱ्यांमुळे निर्माण झालेल्या छाया-प्रकाशामुळे दिसतात हे सिद्ध झाले आहे. चंद्रावर वायूमंडल नाही. तिथले आकाश कायम काळेकुट्ट असते. पृथ्वीपेक्षा चंद्रावर गुरुत्वाकर्षण खूप कमी आहे. आपण चंद्रावर गेलो तर आपल्याला 'पृथ्वीकोर' दिसते. तसेच चंद्रावरून आपल्याला सूर्यग्रहणही दिसते. आपल्याला चंद्राचा संपूर्ण भाग कधीच दिसत नाही. अशा अनेक गोष्टी विज्ञानामुळे आपल्याला समजल्या आहेत. इतकेच नव्हे, तर चंद्र हा पृथ्वीचा उपग्रह नसून सूर्यमालेतीलच तो एक घटक आहे, असेही शास्त्रज्ञांनी सिद्ध केले आहे.

**ग्रहणासंबंधीच्या दंतकथा**

आपल्याला ठराविक काळानंतर सूर्यग्रहण व चंद्रग्रहण दिसते, ते सूर्य-चंद्र-पृथ्वी सरळ रेषेत आल्यामुळे. चंद्रग्रहणासाठी पृथ्वी ही चंद्र आणि सूर्य यांच्या दरम्यान येते. त्यामुळे पृथ्वीची सूर्य प्रकाशातली सावली चंद्रवार पडते आणि चंद्र काळोखात जातो. हे फक्त काही पौर्णिमेलाच घडते. तसेच सूर्यग्रहणासाठी पृथ्वी आणि सूर्याच्या मध्ये चंद्र येतो. हे अमावस्येलाच घडते. परंतु प्रत्येक अमावस्येला नव्हे. याचे कारण म्हणजे या तिन्हींच्या फिरण्याच्या कक्षा व गती वेगवेगळी आहे.

ग्रहणांची वैज्ञानिक कारणे मी आपणांस सांगितली. परंतु या ग्रहणासंबंधी लोकांमध्ये अनेक गैरसमजूती प्रचलित आहेत. समुद्रमंथनातून अमृत निर्माण झाले. ते विष्णूने मोहिनीच्या रूपात देव-दैत्यांच्या समोरासमोरील रांगांमधून वाटण्यास सुरुवात केली. तेव्हा आपल्याला आधी अमृत मिळावे म्हणून चंद्र व सूर्याच्या मध्ये राहू नावाचा दैत्य बसला ही लबाडी समजल्यावर विष्णूने त्याचे मस्तक उडवले. परंतु अमृत प्यायल्याने तो जिवंत राहिला. त्याच्या शिरास राहू व धडास केतू नाव पडले. त्या दोघांनी चंद्र-सूर्याचा सूड घेण्याची प्रतिज्ञा केली. त्यांना ग्रासण्यासाठी ते अधूनमधून त्यांच्यावर झडप घालतात तेव्हा ग्रहण लागते. देवांच्या साहाय्याने चंद्र-सूर्याची

या ग्रहणातून सुटका होते असे मानतात.

या झगड्यावेळी चंद्र-सूर्याच्या अंगातून रक्त निघून जाते व त्यांची मुखे काळवंडतात. राहू-केतू हे मांग जातीचे असून ते चंद्र-सूर्य-पृथ्वी यांच्यामध्ये येतात. त्यांना स्पर्श करून ग्रासण्याचा प्रयत्न करतात. राहू त्यांच्या दैनिक भ्रमणास प्रतिबंध करतो. चंद्र-सूर्यास गिळून टाकतो. पण त्याचा घसा कोरडा असल्यामुळे थोडाच वेळ अदृश्य होऊन ते बाहेर पडतात. भंगी जातीचा एक धनको आहे. तो आपले कर्ज वसूल करण्यासाठी सूर्य-चंद्राकडे जातो, तेव्हा त्याची छाया पडून ग्रहण लागते. असेच राहू-केतू हेही आपले कर्ज वसुलीला जातात अशीही समजूत आहे. चंद्र-सूर्य हे मेरू पर्वताच्या भोवती फिरत असतात. त्या पर्वताची सावली जेव्हा त्यांच्यावर पडते तेव्हा ग्रहण लागते अशीही समजूत काही लोकांमध्ये प्रचलित आहे.

आपल्याला दिवस प्रकाश देणारा सूर्य व रात्री प्रकाश देणारा चंद्र अचानक अस्तंगत होऊन काळाख पडतो असे लक्षात आल्यावर या अचानक घडणाऱ्या घटनांमुळे मनुष्य अचंबित झाला व या घटना अशुभ आहेत असे समजूत ग्रहणावेळी अनेक कृत्ये करू लागला.

**ग्रहणांवेळी प्रचलित असणारी कृत्ये**

ग्रहणाच्या सुरुवातीस व शेवटी लोकं स्नान करतात. उपवास करतात. ग्रहण हे अशुभदर्शक मानतात. बघत नाहीत. ग्रहणकाळ अशुभ मानतात. घरातील अन्न व पाणी विटाळते म्हणून एकतर ते फेकून देतात अथवा त्यावर तुळशीपत्र ठेवतात. ग्रहण सुटल्यावर महार, मांग, भिकाऱ्यास अन्न व वस्त्रदान करतात. कपडे, पैसे, तीळ, उडीद, डाळी, मीठ तसेच जोडा दान देतात. काही ठिकाणी बाजरीच्या दाण्यांनी चंद्राची अथवा सूर्याची आकृती काढून ती भंग्यास देतात. ग्रहणाचा गर्भवतीवर सर्वात जास्त परिणाम होतो असे समजतात. ग्रहणावेळी गर्भवतीस खूप जपतात. ग्रहणकाळी जर गाय वीत असली तर तेव्हा तिच्याभोवती प्रदक्षिणा घातल्याने पृथ्वी प्रदक्षिणा केल्याचे पुण्य लाभते असे समजतात. ग्रहणकाळात देवांच्या मूर्ती पाण्यात बुडवून ठेवतात. ग्रहणांच्या वर्षी धान्याची समृद्धी येते असे ठाण्यात मानतात. ढगांमुळे ग्रहण दिसत नसले तर एका भांड्यात पाणी भरून त्यात मुसळ उभे धरून ठेवण्याची चाल कोंकणात आहे. मुसळ सोडले असता उभे राहिले तर ग्रहण सुरू आहे आणि पडले तर ग्रहण सुटले असे मानतात. ग्रहणकाळी वांझ झाडास अथवा स्त्रीस हातोड्याने मारतात. त्यामुळे सुफलता येते अशी समजूत आहे. ग्रहणकाळात चिरणे, शिवणे अशी कृत्ये करत नाहीत. या काळाला अशुभ समजत असले तरी जारणमारणा सारख्या मंत्रतंत्रास मात्र हा काळ शुभ मानतात. अशा वेळी नदीवर पाण्यात एकांत स्थळी उभे राहून गुरूने शिकविलेल्या मंत्राचा जप केला असता त्यास जारणमारण, विंचू, सर्प इ. विषयीची सिद्धता प्राप्त होते. जादू, चेटूक करणारी माणसे या काळात घोड्याची नाल, पाच प्रकारच्या धातू अथवा गलबतांचे खिळे ह्यांच्या अंगठ्या, कडी अथवा ताईत केल्यास ते विशेष गुणदायी होतात असे समजतात.

**ग्रह, तारे, उल्का, धूमकेतू, आकाशगंगा**

अवकाशातील या सर्व गोष्टीच्या संदर्भात अनेक वर्षे मनुष्याच्या मनात अनेक गैरसमजूती होत्या. अनेक दंतकथा तो खऱ्या मानत होता. पुण्यवान साधू व पुण्यवान पुरुषांचे आत्मे मृत्यूनंतर अवकाशात जातात व त्यांचे तारे बनतात. त्यांच्या पुण्याच्या प्रमाणात त्या ताऱ्यांना कमी-अधिक तेज प्राप्त होते. सप्तर्षींच्या कथा प्रचलित आहेतच. उत्तानपाद राजाचा मुलगा ध्रूव याला निश्चल भक्तीमुळे अवकाशात अढळपद प्राप्त झाले असे मानतात. सूर्यमालेतील नवग्रहांविषयी तर अक्षरश: असंख्य समजूती प्रचलित आहेत. काही ग्रह शुभ तर काही अशुभ मानतात. त्या ग्रहांची शांती वगैरे करतात. नक्षत्ररूप घेतलेले पुण्यात्मे दुसरा जन्म घेण्यासाठी पृथ्वीवर पडतात. त्यांना उल्का समजतात. देवांचे रथ एकमेकांवर घासून जे अग्नीकण उत्पन्न होतात, त्या उल्का होत अशीही समजूत आहे. उल्कापात होताना पाहणे ही क्रियाही शुभाशुभ फले देणारी मानतात. या विषयीही अनेक समजूती आहेत. उल्का पडतात म्हणजे नक्की काय होते? तर,

सूर्याभोवती अनेक लहान-मोठे खडक फिरत असतात. ते भ्रमण करीत असताना पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणामुळे खेचले जातात व घर्षणामुळे प्रकाश उत्पन्न होतो. त्याला उत्कापात म्हणतात. ही क्रिया सतत घडते. पृथ्वीवर पोहोचेपर्यंत बऱ्याचदा त्या नष्ट होतात. परंतु एखादे लोणार सरोवरासारखे अपवादात्मक उदाहरण दाखविता येईल. धूमकेतूचा उदय झाला असता मोठी लढाई, मोठा दुष्काळ, भयंकर रोगाची साथ इ. ओढवतात अशी समजूत आहे. भगीरथाने जी गंगा पृथ्वीर आणली, तीच आकाशगंगा होय. एकचक्री स्थान बसून सूर्य ज्या मार्गाने प्रवास करतो तो मार्ग म्हणजे आकाशगंगा. वामनाचे तिसरे पाऊल एका अंड्यास लागले. त्यातून जो प्रवाह निघाला, तीच आकाशगंगा. स्वर्गावर चढण्याची शिडी म्हणजे आकाशगंगा. ही पाप व पुण्य अशा दोन रेषांची आहे. एखाद्या इसमास आकाशगंगा दिसली तर त्याचा मृत्यू जवळ आला आहे. अशा अनेक समजूती जनांमध्ये प्रचलित आहेत.

वास्तविक अवकाशात अनेकानेक आकाशगंगा आहेत. या अनेक ताऱ्यांच्या बनलेल्या आहेत. 'धूमकेतू' या विषयावर खगोल शास्त्रज्ञांनी भरपूर अभ्यास करून गणिते मांडली आहेत. आपण या प्रचलित गैरसमजुती बाजूला सारून या विषयाची वैज्ञानिक माहिती घ्यायला हवी. ती रोचक आहे. माझ्या या लेखमालेचा उद्देश लौकिक दंतकथांच्या मागचे वस्तव सर्वांना समजावे हा आहे. या निमित्ताने आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या अनेक विचित्र, वेगळ्या गोष्टी विवेकाने समजून, त्यामागचा कार्यकारण भाव लक्षात घ्यावा असा आहे.

**- सुधीर दाजी जोशी,**
मोबा. ९८२२२९८७२६

# वारी विठ्ठलाची...

विठुरायासाठी वेडावला जीव,
धाव घेई आता पंढरपुरी...
एकच ती आस ध्यास तोची एक,
दर्शन व्हावे आता विठुराया..

डोईवर तुळस हाती चिपळ्या धरी,
चाले अनवाणी वारकरी...
होऊनि बेभान नामघोष करी,
मुखी गुणगान माऊली माऊली...

नसे व्यर्थ चिंता काळजी कशाची,
ओढ एक त्याची अंतर्यामी...
जमे वैष्णवांचा मेळा चंद्रभागे तीरी,
जयघोष होई विठुराया...

चंद्रभागे मध्ये करोनिया स्नान,
दर्शन घेती विठू माऊलीचे...
होऊनिया लीन पांडुरंग चरणी,
टेकवती माथा भक्तिभावे...

पंढरीची वारी घडो जन्मोजन्मी,
संपावे जीवन पांडुरंग चरणी...
नको आता काही एक इच्छा मनी,
विटेचे स्थान तू मज द्यावे...

**- मंदार पानवलकर.**

**'नवस्नेह' च्या माध्यमातून आपल्या पाल्याचे विवाह जुळल्यास पालकांनी कृपया याची माहिती कोल्हापूर चित्पावन संघास कळवावी, ही नम्र विनंती.**

## सभासदांसाठी भक्तनिवास नोंदणी विनामोबदला

आपली गैरसोय टाळण्यासाठी कोल्हापूर मुक्कामासाठी आपल्या भक्तनिवासाची आगावू नोंदणी करा.
तात्काळ नोंदणीसाठी **संपर्क : श्री. गिरीश जोग फोन : ९४०४६०९५९७, ९८२२०३८८९७**
येताना आधार कार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स अशा फोटो व पत्ता असणाऱ्या शासकीय दस्तऐवजाची प्रत जमा करणे आवश्यक आहे.

**हार्दिक अभिनंदन !**

## मृगांक मिलिंद गोगटे



- इ. १ ली ते १० वी प्रायव्हेट हायस्कूल येथे शिक्षण.
- इ. १० वी मध्ये (२०१३) ८९% मार्क
- १२ वी मध्ये (२०१५) डी.आर.के. कॉलेज ऑफ कॉमर्स मधून ८१% गुण मिळवून उत्तीर्ण
- जून २०१५ CA CPT उत्तीर्ण
- २०१९ मध्ये B.Com उत्तीर्ण (प्रथम श्रेणी)
- मार्च २०१९ CA IPCC उत्तीर्ण
- केदार कुंभोजकर ॲन्ड कंपनी कोल्हापूर येथे ३ वर्षे आर्टिकलशिप पूर्ण
- डिसेंबर २०२१ मध्ये CA Final परीक्षा उत्तीर्ण.
- सध्या ICICI बँक बेंगलोर येथे डेप्यूटी मॅनेजर (क्रेडीट) म्हणून कार्यरत.


*विनोद*

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी**
**आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**बँक ऑफ महाराष्ट्र, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 20128506183)**
**IFSC Code : MAHB0000326**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

**दिनविशेष (सप्टेंबर, २०२२)**
**भाद्रपद-अश्विन शालिवाहन शके १९४४**
**प्लवनाम संवत्सरे**

सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका

**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे ।**
**साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**



**गुरुवार दि. १ :** ऋषी पंचमी, गजानन महाराज पुण्यातिथी, कलावतीदेवी जयंती, **शनिवार दि. ३ :** ज्येष्ठा गौरी आवाहन, दुर्गाष्टमी, **सोमवार दि. ५ :** शिक्षक दिन, ज्येष्ठा गौरी विसर्जन, घरगुती गणेश विसर्जन, श्री रामकृष्ण परमहंस पुण्यतिथी, **गुरुवार दि. ८ :** साक्षरता दिन, **शुक्रवार दि. ९ :** अनंत चतुर्दशी, सार्व.गणेश विसर्जन, पौर्णिमा, **मंगळवार दि. १३ :** अंगारक संकष्ट चतुर्थी (चंद्रो.८.४८), **बुधवार दि. १४ :** हिंदी दिन, **गुरुवार दि. १५ :** अभियंता दिन, **शुक्रवार दि. १६ :** श्रीज्ञानेश्वरी जयंती, **शनिवार दि. १७ :** मराठवाडा मुक्तीदिन, **शुक्रवार दि. २३ :** विषुव दिन, **शनिवार दि. २४ :** हृदयविकार जागृतता दिन, **सोमवार दि. २६ :** घटस्थापना, शारदीय नवरात्रारंभ, **मंगलवार दि. २७ :** पर्यटन दिन, **बुधवार दि. २८ :** कर्णबधीर दिन, **शुक्रवार दि. ३० :** ललिता पंचमी, श्री त्र्यंबोली यात्रा, करवीर

## सुवर्णमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाच्यावतीने
## रविवार दि. २ ऑक्टोबर २०२२ रोजी
# श्रीमहालक्ष्मी अष्टमी जागर सोहळ्याचे आयोजन

कोल्हापूर - कोल्हापूर चित्पावन संघाच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही 'श्रीमहालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा' व 'महाप्रसाद' रविवार दि. २ ऑक्टोबर २०२२ रोजी ब्राह्मण सभा करवीर, मंगलधाम येथे साजरा करणेचे योजिले आहे. प्रत्येक ज्ञातीबांधवाने महाप्रसादाचा लाभ घ्यावा असा मानस आहे. त्यादृष्टीने संघाने नियोजनाची सुरुवात केली आहे, अशी माहिती संघाचे अध्यक्ष नंदकुमार मराठे, उपाध्यक्ष प्रसाद भिडे, कार्यवाह केदार जोशी व संचालक मकरंद करंदीकर यांनी दिली.

याबाबतीत सविस्तर माहिती देताना अध्यक्ष मराठे पुढे म्हणाले, आपल्या कुटुंबातील किती सभासद प्रसादासाठी येणार आहेत याची नोंद संघाचे कार्यालय व श्री परशुराम पतसंस्था येथे प्रत्यक्ष भेटून अथवा फोन, व्हॉटस्ॲपवरून करावी. ज्यायोगे महाप्रसादाचे योग्य नियोजन करणे सोयीचे होईल. सर्व ज्ञातीबांधव शिस्तप्रिय असल्याने कार्यक्रमाचे योग्य नियोजन, महाप्रसाद तयार करण्यासाठीची तयारी, संभाव्य अपव्यय व गैरसोय टाळणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. त्यादृष्टीने सर्वांनी आगाऊ नोंदणी करणे आवश्यक व अपेक्षित आहे.

गतवर्षी प्रमाणे यावर्षीही सोयीचे दृष्टीने 'महाप्रसाद पास' योजना करणेचे निश्चित केले आहे. आपण चितपावन संघ, श्री परशुराम पत संस्था येथे महाप्रसादासाठी नोंदणी करुन पास घेऊ शकता. तसेच संघाचे सर्व संचालक, सल्लागार व खाली दिलेल्या महिला प्रतिनिधी यांचेकडे नांव नोंदणी करुन पास घेऊ शकता. दूरवर राहणारे ज्ञातीबांधव फोन करुन देखील महाप्रसाद नोंदणी करु शकतात, त्यांना कार्यक्रमावेळी पास देण्याची व्यवस्था केली जाईल. नोंदणी व पास ही संकल्पना महाप्रसाद नियोजनासाठी राबविण्यात येत आहे, याची कृपया नोंद घ्यावी.आपण सहकार्याचा हात दिल्यास एक आदर्श महाप्रसाद नियोजन संपन्न होईल, याची आम्हास खात्री आहेच.

वशेळ्यांनी आपली नोंदणी कोल्हापूर चितपावन संघ व श्री परशुराम पतसंस्था व महिला प्रतिनिधी यांचेकडे प्रत्यक्ष, फोनवरुन अथवा व्हॉटस्ॲपद्वारे करावी. त्याची नोंदणी फी रु. १५० प्रत्येकी आहे याची नोंद घ्यावी.

उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे यांनी सांगितले की, अष्टमी जागर निमित्ताने आयोजित महाप्रसादासाठी सुमारे १००० ज्ञातिबांधव सहभागी व्हावेत या दृष्टीने आम्ही नियोजनाची आखणी केली आहे. महाप्रसादासाठी ज्ञातीबांधवांनी सढळ हाताने अर्थसाहाय्य तसेच देणगी द्यावी अशी अपेक्षा आहे. महाप्रसादासाठी लागणाऱ्या शिधाखर्चाची यादी पुढे दिली आहे. रोख रक्कम स्वरूपात देणगी दिल्यास आम्हाला संयुक्तपणे शिधा आणणे सोयीचे होईल, असेही श्री. भिडे यांनी सांगितले. नियोजनाचे दृष्टीने आपण शिधाखर्च रोख अथवा पुढे दिलेल्या पर्यायांनी जमा करू शकता. अधिक माहितीसाठी संबंधितांनी कोल्हापूर चित्पावन संघ, फोन : ०२३१-२५४६२२५ / २९९१६७३, मो. ७६२०५४६२२५ व श्री परशुराम नागरी सह.पत संस्था म; कोल्हापूर मोबा. ८८५७०७६१६३ येथे संपर्क साधावा.

अधिक माहितीसाठी आमच्या महिला प्रतिनिधींशी संपर्क साधावा.

सौ. सीमा सुरेश गोखले (९४२०४५५१५९)

सौ. संगीता संजय आपटे (८१४९४८००३४)

सौ. अर्चना मोहन दातार (९६३७२४८९०८)

सौ. अश्विनी प्रसाद भिडे (९६२३६७४७४२)

सौ. माधुरी मकरंद करंदीकर (९७६५६५११६९)
सौ. पंकजा गोरे (९४२११०००४७)
सौ. अपूर्वा केळकर (९६५७८६५३३९)
श्रीमती वासंती लिमये (९१५८८५९६०३)

तसेच ज्या व्यक्तींना बँकेमध्ये पैसे पाठवायचे आहेत त्यांनी संस्थेच्या पुढील खात्यात रक्कम जमा करावी व त्याचा स्क्रीन शॉट पाठवावा. कृपया बँकेत पैसे जमा केल्यास रिमार्क जागेत आपले नाव अवश्य लिहावे.

बँकेचे नाव – बँक ऑफ महाराष्ट्र
बँकेची शाखा – महाद्वार रोड, कोल्हापूर.
खाते नंबर – २०१२८५०६१८३
IFSC Code - MAHB0000326

**भारतातील अती महत्वाच्या संस्थांची घोषवाक्ये संस्कृत मधील आहेत. अवश्य वाचा. अशी माहिती कोठे वाचावयास मिळणार नाही.**

- संपूणानंद संस्कृत विश्वविद्यालय= श्रुतं मे गोपाय
- श्री वैंकटेश्वर विश्वविद्यालय= ज्ञानं सम्यग् वेक्षणम्
- कालीकट विश्वविद्यालय = निर्भय कर्मणा श्री
- दिल्ली विश्वविद्यालय = निष्ठा धृति: सत्यम्
- केरल विश्वविद्यालय = कर्मणि व्यज्यते प्रज्ञा
- राजस्थान विश्वविद्यालय = धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा
- पश्चिम बंगाल राष्ट्रीय न्यायिक विज्ञान विश्व–विद्यालय = युक्तिहीने विचारे तु धर्महानि: प्रजायते
- वनस्थली विद्यापीठ = सा विद्या या विमुक्तये।
- राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान और प्रशिक्षण परिषद्= विद्यीामृतमश्नुते ।
- केन्द्रीय विद्यालय = तत् त्वं पूषन् अपावृणु
- केन्द्रीय माध्यमिक शिक्षा बोर्ड = असतो मा सद्गमय
- प्रौद्योगिकी महाविद्यालय, त्रिवेन्द्रम = कर्मज्यायो हि अकर्मण:
- देवी अहिल्या विश्वविद्यालय, इन्दौर = धियो यो नः प्रचोदयात्
- गोविंद बल्लभ पंत अभियांत्रिकी महाविद्यालय, पौड़ी = तमसो मा ज्योतिर्गमय
- मदनमोहन मालवीय अभियांत्रिकी महाविद्यालय गोरखपुर = योगः कर्मसु कौशलम्
- भारतीय प्रशासनिक कर्मचारी महाविद्यालय, हैदराबाद = संगच्छध्वं संवदध्वम्
- इंडिया विश्वविद्यालय का राष्ट्रीय विधि विद्यालय = धर्मो रक्षति रक्षितः
- संत स्टीफन महाविद्यालय, दिल्ली = सत्यमेव विजयते नानृतम्
- अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान = शरीरमाद्यं खलुधर्मसाधनम्
- विश्वेश्वरैया राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थान, नागपुर = योग: कर्मसु कौशलम्
- मोतीलाल नेहरू राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थान, इलाहाबाद = सिद्धिर्भवति कर्मजा
- बिरला प्रौद्योगिकी एवं विज्ञान संस्थान, पिलानी= ज्ञानं परमं बलम्
- भारतीय प्रौद्योगिकी संस्थान खड़गपुर= योगः कर्मसुकौशलम्
- भारतीय प्रौद्योगिकी संस्थान मुंबई= ज्ञानं परमं ध्येयम्
- भारतीय प्रौद्योगिकी संस्थान कानपुर= तमसो मा ज्योतिर्गमय
- भारतीय प्रौद्योगिकी संस्थान चेन्नई= सिद्धिर्भवति कर्मजा
- भारतीय प्रौद्योगिकी संस्थान रुड़की= श्रमं विना नकिमपि साध्यम्

(संकलित)

# स्वच्छ भारत

आपल्या देशाची गणना प्रगत देशात होत नाही हे आपल्याला मान्य करायला हवे . जगातील प्रगत देशासारखा आपला देश असावा असे कोणाला वाटणार नाही ? आज आपले अनेक नागरिक आपली सुट्टी आनंदात घालवण्यासाठी परदेशी जातात. तिकडून आले की त्या देशातील स्वच्छतेचे भरभरून वर्णन करतात. तिकडे हवेत धूळ नाही, शुद्ध पाण्याची कमतरता नाही, भाजी आणि फळ फळावळ एकदम रसरसलेली असतात, रस्त्यावर खड्डे नसतात, सर्वजण नियमाने वागतात, वेळेचे महत्व जाणतात, तिकडची माणस झाडांची खूप काळजी घेतात . त्यांना जीवापाड जपतात. अशी वर्णन करताना आपणही त्या माणसांसारखे वागावे असं तिकडचे वर्णन करणाऱ्या माणसांना जराही वाटत नाही. दिवसे दिवस परदेशी जाणाऱ्या, तेथील नागरिकत्व मिळविलेल्या, तेथेच स्थाईक होऊ पाहणाऱ्या किंवा स्थाईक झालेल्या लोकांची संख्या वाढतच चालली आहे. या वाढणाऱ्या लोकांच्यामुळे तरी भारतातील लोक नियमाने वागतील, स्वच्छतेचा अवलंब करतील असे वाटले होते. पण प्रत्यक्षात तिकडून येणारे लोक इकडे आले कि इथल्या लोकांना नावे ठेवणे आणि इथल्या लोकांसारखेच वागताना दिसतात.

पण, सौंदर्याने नियमाला अपवाद बनायचे ठरवेले. हिथ्रो ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरष्ट्रीय विमानतळावर उतरेपर्यंत तिच्या डोक्यात तिचे सर्व प्लान्स तयार होते. ग्रीन क्यारीडोर मधून ती सहज निघून जाऊ शकत होती. पण तिने तसे केले नाही. ती सरळ कस्टम ऑफिसर समोर उभी राहिली. आपल्या बॅगेतील लॅपटॉप, नवऱ्यासाठी घेतलेला आयफोन, सासऱ्यांसाठी घेतलेले कान मशीन आणि मुलासाठी घेतलेली रिमोटवर चालणारी कार या सर्वाना त्यांच्या बिलां सकट तिने कस्टम अधिकाऱ्याला दाखवले. क्षणभर तो अधिकारी देखील चकित झाला. त्याने सौन्दर्याकडे सहेतुक बघितले. कुणी पुरुष माणूस बरोबर आहे का याचा अंदाज घेतला. सगळ्यांची ड्युटी भरायची? त्याच्या प्रश्नाचा गर्भित अर्थ वेगळाच होता.

आता तुम्ही एवढ्या प्रामाणिकपणे इथे आलात तर आपल्याला सहकार्य करणे आमचेही काम आहे. कान मशीन वर ड्युटी घेत नाही. चालेल, जसे नियमात असेल तसे करा. सौंदर्या टॅक्सीत बसली. मुंबईच्या हवेचा सुगंध तिने भरभरून घेतला. गेले वर्षभर ती या सुगंधाला विसरली होती. तिने सहज कस्टमची पावती न्याहळून बघितली. तिने भरलेली रक्कम आणि पावती वरील रक्कम यात बराच फरक होता. तिने भरलेली रोख रक्कम पावतीतल्या रक्कमेपेक्षा खूपच जास्त होती. वेळ निघून गेली होती. विमानतळापासून ती खूप दूर पोहोचली होती .

ड्रायव्हरने झटकन यू टर्न घेतला आणि गाडी खडखडाट करत रस्त्याच्या विरुद्ध बाजूला आली. 'अरे ये क्या कर राहे हो?' सौंदर्या जवळजवळ किंचाळलीच. 'बहेनजी, यहाँ अगर यू टर्न नही लेते तो कमसे कम दस किलोमीटर घुमना पडता था । यहाँ पोलिसभी नही राहता है ।' ड्रायव्हरच्या बोलण्यात आपण चुकीचे वागत आहोत याचा जरा देखील लवलेश नव्हता.

उद्यापासून प्रथम आपले घर आणि मग संकुल कसे सुंदर करायचे याचा विचार करत ती संकुलात प्रवेशली. वॉचमन दारातच टेबलावर झोपला होता. सोसायटीचा कचरा वेचक प्रत्येक विंग मधून कचऱ्याने ओथंबलेल्या बादल्या खाली आणत होता.

सौंदर्या गाडीतून उतरली. तिचे पहिलेच पाउल पेव्हर ब्लॉक उखडल्यामुळे तयार झालेल्या खड्यात पडले. मार्ग कठीण आहे याची सौंदर्याला मनोमन कल्पना आली. स्वत: स्वच्छ आणि सुंदर बनायचे आणि परिसर देखील स्वच्छ आणि सुंदर बनवायची तिची स्वप्ने मात्र आजून घट्ट होती. शेवटी स्वप्नेच महत्वाची असतात. नाही का?

**– कौस्तुभ ताम्हनकर,** ९८१९७४५३९३

# सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचित आहोत.

– व्यवस्थापक

**अध्याय २ : सांख्ययोग**

**अर्जुन उवाच ।**

स्थितप्रज्ञ का भाषा समाधिस्थस्य केशव ।
स्थितधी: किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ।।

**अर्जुन म्हणे हृषीकेशी ।**
**जो स्थिर बुद्धि त्याची वर्तणूक कैसी ।**
**योग पावलिया त्यासी ।**
**ओळखी कैसी बोलिजे ।।५४।।**

**श्रीभगवानुवाच ।**

प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।
आत्मन्येवात्मना तुष्ट: स्थितप्रज्ञस्तदोच्यते ।।

**देव म्हणे गा पार्था । जो नातळे कामना मनोरथा।**
**आपण आत्मस्थिति सुखात्मता ।**
**तो समाधिस्त बोलिजे ।।५५।।**

दु:खेष्वनुद्विग्नमना: सुखेषु विगतस्पृह: ।
वीतरागभयक्रोध: स्थितधीर्मुनिरुच्यते ।।

**दु:खे निश्चळ निस्पृह सुखसंगी ।**
**भय क्रोध सांडुनी वितरागी ।**
**तो मुनी ज्ञानसंगी । स्थिर बोलिजे ।।५६।।**

य: सर्वत्रानभिस्नेह: तत्तत्प्राप्य शुभाशुभम् ।
नाभिनन्दति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ।।

**शुभाशुभ प्राप्त जालिया ।**
**ममत्वे न गुंते आणि किया ठाया ।**
**आनंद द्वेष बुद्धि नातळे जया ।**
**तयासीच ज्ञान जाले ।।५७।।**

यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वश: ।
इंद्रियाणीन्द्रियार्थेभ्य: तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ।।

**कासव आपुले अंग जैसे ।।**
**आवरी आपुले हात पाय सर्वस्वे ।**
**तैसे तो इंद्रिय आवरूनी विशेषे ।**
**तयासी ज्ञान प्रतिष्ठिले ।।५८।।**

विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिन: ।
रसवर्ज रसोऽप्यस्य परं द्रष्ट्वा निवर्तते ।।

**जो निराहारी होउनी असे ।**
**त्याचे रसवर्जित विषय तुटती फांसे ।**
**साक्षात्कारी योगी मन वसे ।**
**मग तो रसाचाही त्याग करी ।।५९।।**

यततो ह्यपि कौन्तेय पुरुषस्य विपश्चित: ।
इंद्रियाणि प्रमाथिनि हरन्ति प्रसभं मन: ।।

**जरी पुरुष प्रयत्न करी विचक्षण ।**
**ज्ञानी पुरता असोनी आपण ।**
**तुम्ही इंद्रिय बळत्कारे हरिती मन ।**
**अर्जुना हें जाण निश्चित ।।६०।।**

तानि सर्वाणि संयम्य युक्त आसात मत्पर: ।
दशे हि यस्येन्द्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ।।

**हे सर्व नमावया लागुनी । युक्ति नाही योगाहुनी ।**
**सर्व इंद्रिया वश्य केलियानी ।**
**तयासी ज्ञान प्रतिष्ठिते ।।६१।।**

## शब्दकोडे माहे सप्टेंबर २०२२

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | X | ५ | ६ |
| ७ | | | X | ८ | | | |
| X | ९ | | १० | | X | | X |
| ११ | | X | | X | १२ | | १३ |
| | X | १४ | | १५ | | X | |
| १६ | १७ | | X | १८ | | १९ | X |
| २० | | X | २१ | | X | २२ | |

**आडवे शब्द :**

१. एक प्रकारचा ताप, २. वासर, ३. क्रिकेट खेळातील 'ओव्हर' या शब्दाला मराठी शब्द, ४. 'XX XX दम' दूरदर्शन सह्याद्री वाहिनीवरील लहान मुलांचा नृत्याचा कार्यक्रम, ९. कट, ११. जल, पाणी, १२. डोकं, शिर, १४. लढाऊ गलबतांचा तांडा, १६. केशरी अथवा तांबूस रंगाचं एक लांबट कंद, १८. पंच, मध्यस्थ, २०. सातू, बार्ली, २१. गूळ, साखर इ. चा पाक, रांधा, २२. फळातील द्रव, एखाद्या गोष्टीत वाटणारा आनंद.

**उभे शब्द :**

१. जहर, गरळ, २. क्रिकेटमधील सह धावांचा फटका, ३. राशींमधील १० वी रास, ४. दंत, दात, ५. ज्याविषयी वाद चालला आहे असा, ६. लक्ष्मी, कमला, १०. न हलविता येणारी मालमत्ता, ११. पांढऱ्या पायांचा काळवीट, १२. 'हिरवा X X X वेणीत घाला, माझ्या वेणीत घाला' (गाण्याची ओळ), १३. रेतीचे बारीक कण, माघार, १४. अजगर, १५. धनी, स्वामी, १७. पुष्कळ अंशी गव्हाच्या रोपासारखी दिसणारी एक आयुर्वेदिक औषधी वनस्पती, १९. किंमत, दाम, भाव.

**– सौ. मधुरा संतोष शिधये,**
मोबा.९८१९७७०९७०

## सांगा पाहू?

१. पोलंडमधील वॉर्सा शहर कोणत्या नदीच्या काठी वसले आहे?

२. अरगॉन या निष्क्रिय वायूचा शोध कोणी लावला?

३. रेशमाच्या किड्यांना 'पेब्रिन' हा रोग कोणत्या जीवाणूंमुळे होतो?

४. खानदेशातील 'गौताळा' अभयारण्य कोणत्या डोंगर रांगांच्यामध्ये वसले आहे?

५. ओरिसातील सुप्रसिद्ध गोड पदार्थाचे नाव काय

६. इंग्लंडमध्ये लहान शहरात किंवा खेड्यात जिथे क्रिकेट खेळले जात त्या जागेला (मैदानाला) काय म्हणतात?

७. आईसलँड देशाच्या राजधानीचे नाव काय आहे?

८. 'शांघाय' शब्दाचा शब्दशः अर्थ काय?

९. कटकट, भांडणं व आरडाओरडा यामुळे कोणते ताणकारक व राग वाढवणारे रसायन तयार होते?

१०. शरीरातील मज्जातंतूंवर असणाऱ्या आवरणाचे नाव काय?

(उत्तरे अन्यत्र पहा.)

**– सौ. मधुरा संतोष शिधये,**
मोबा.९८१९७७०९७०

### शब्दकोडे माहे सप्टेंबरचे उत्तर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ वै | २ ज | यं | ३ ती | ४ मा | ५ ला |
| ६ मा | ड | X | ७ र | व | ळ |
| नि | X | ८ वा | क | ळ | X |
| ९ क | १० न्या | X | ११ म | त | १२ म |
| X | १३ य | १४ म | ळ | X | दा |
| १५ | स | र | X | १६ ह | र |
| X | १७ भा | ग | व | त | X |
| १८ सा | X | ळ | X | १९ ब | २० स |
| २१ र | ब | X | २२ क | ल | म |

शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

## (लेखांक अठरावा)

निवृत्तीनं जेव्हा गुरू म्हणून ज्ञानदेवाच्या मस्तकावर हात ठेवला, तेव्हा ज्ञानदेवाला आलेली अनुभूती इतकी तीव्र आणि अकल्पित होती की, क्षणभर आपल्याला मूर्च्छा आली की काय, असं ज्ञानदेवाला वाटलं. निवृत्तीचा मस्तकावर ठेवलेला हात, हा हात नसून कल्पद्रुमाचं पान असावं, इतकी शीतलता, इतकी संवेदनशीलता त्या हस्तस्पर्शात होती. आपल्या माथ्यावर निवृत्तीदादाचा हात नसून जणू जौर्णिमेचा पूर्ण चंद्रच आहे, असं ज्ञानदेवाला वाटत होतं आणि त्या हातातून निर्माण होऊन प्रवाहित होणारी ऊर्जा जेव्हा ज्ञानदेवाच्या मस्तिष्कात शिरली, तेव्हा त्याच्या शरीराचा रोमन्‌रोम थरारला. संपूर्ण ज्ञानाचा प्रवाहच आपल्या नसानसात वाहतो आहे आणि त्या प्रवाहानं आपल्या रक्ताचा थेंबन्‌थेंब भरून गेला आहे, तर कधी चुलीतल्या अग्नीसारखा उबदार आहे. त्या स्पर्शातून झिरपणारं ज्ञान, माया, वात्सल्य, विश्वास आणि या सर्वांमागं असलेली गुरुत्वाची साक्ष, या सगळ्याने ज्ञानदेवाचा अणुरेणू व्यापला आणि त्या चैतन्याच्या वर्षावानं, त्या ज्ञानाच्या अभिव्यक्तीनं, त्या गुरुत्वाच्या अनुभूतीनं तो अवघा सहा-सात वर्षांचा ज्ञानेश्वर विलक्षण थरारला.

त्या सहस्त्र रश्मी सूर्यापुढे एखादा जलद यावा आणि काही काळ तो भास्कर झाकला जावा आणि अचानक जलद नाहीसा होऊन पुन्हा तो भास्कर अभूतपूर्व तेजानं तळपावा, तसं ज्ञानेश्वराचं झालं. आई-वडिलांच्या आत्मसमर्पणानंतर दु:खानं काळवंडलेला, जबाबदारीच्या जाणिवेनं उदासलेला त्याचा चेहरा निवृत्तीच्या गुरुस्पर्शानंतर असा काही तेजाळला, की ही घटना दूर क्षितिजावर उगवू पाहणाऱ्या त्या भास्करानं जेव्हा पहिली तेव्हा त्यालाही संभ्रम पडला की सूर्य तो की आपण? ज्ञानेश्वराला मिळाला निवृत्तीसारखा गुरू आणि निवृत्तीला मिळाला ज्ञानदेवासारखा शिष्य. न भूतो न भविष्यति अशी ही घटना एका अलौकिक भविष्याची आधारशीला ठरणार होती, हे नक्की. तिचं तसं भविष्यच होतं.

या सगळ्या साक्षात्कारापासून दूर, अनभिज्ञ असलेले सोपान आणि मुक्ता या दोन भावांची प्रतीक्षा करत होते. आज दोघं जण अगदी शहाण्यासारखी वागली होती. सोपानाचा केर काढून झाल्यावर मुक्तीनं अंगणात सडा मारला होता. त्यावर वेडीवाकडी का होईना, पण रांगोळीची दोन बोटं ओढली होती. दोघांनी धडपडून कशीबशी चूल पेटवली. तीवर पाण्याचं डेचकं ठेवलं. एकदा चूल पेटल्यावर पुन्हा पुन्हा त्यात काही सरपण घालावं लागतं. वैल सारखा करायचा असतो, हे त्या दोघांना कुठून उमजणार? जवेढं काही पाणी कोमटसर झालं, त्यात दोघांनी अंघोळी केल्या; पण नंतर मात्र दोघांना कुठून उमजणार? जेवढं काही पाणी कोमटसर झालं, त्यात दोघांनी अंघोळी केल्या; पण नंतर मात्र दोघांची पंचाईत झाली. मुक्तीच्या जाड केसांची वेणी काही केल्या सोपानाला घालायला येईना. तीन दिवसांपूर्वी आईनं घातलेल्या वेणीचा विसकळा झाला होता आणि त्यातच गुंताही आणि आता तर काय? जे काही थोडेफार केस गुंफलेले होते, तेही गोफातून सुटले होते. नव्हे 'मी घालतो तुझी वेणी' असं म्हणत सोपानानंच ते सोडवले होते. आता पुन्हा गुंता काढून ते केस गोफात गुंतवणं मोठं कठीण काम होतं आणि ते त्याच्या आवाक्याबाहेरचं होतं. अथक प्रयत्न करूनही ना केसांतला गुंता सुटला होता, ना केस गोफात गुंफले गेले होते. 'दुखतंय रे दादा' म्हणत मुक्तीच्या

डोळ्यांतून मात्र असावं वाहायला लागली होती. ना तिचं रडणं थांबत होतं, ना गुंता सुटत होता. सोपाना अथक प्रयत्न करतच होता. आता मात्र हळूहळू मुक्तीचा आवाज वाढला. काही वेळानं तर तिनं चक्क भोकाडच पसरलं आणि सोपानाही थकला. आता त्यानं मुक्तीच्या केसांशी चाललेली झटापट थांबवली आणि तो तिची समजूत घालू लागला. तो जशी तिची समजूत घालायला लागला, तशी मुक्ता जास्तच रडायला लागली. एकतर केस पूर्ण मोकळे झाले होते, ते तिला मानेवर गालावर टोचत होते, त्यातच गुंता काढायच्या नादात तिला खूप दुखलं होतं आणि गुंता निघण्याऐवजी जास्तच झाला होता. त्यातच सोपानदादा मायेनं विचारपूस करतोय म्हटल्यावर मुक्तीला जास्तच रडू यायला लागलं. तिनं आणखीच भोकाड पसरलं आणि मुक्तीला खूप दुखलं असणार आणि हे सगळं आपल्यामुळे म्हणूनती जास्तच रडते आहे, हे बघून सोपानही रडायला लागला. त्या दोघांच्याही रडण्याचा आवाज त्या झोपडीच्या तुटक्या भिंतीतून बाहेर पडला आणि रस्त्यावर रेंगाळला. तो रेंगाळणारा आवाज तिथून पाण्याची कळशी घेऊन चाललेल्या कावेरीअक्कांच्या कानांवर पडला.

या कावेरीअक्का म्हणजे विनायकबुवांच्या मातोश्री. रुक्मिणीबाई त्यांना आईच्या जागी मानत. त्याही रुक्मिणीबाईंना लेक मानत, कारण त्यांचं आणि रुक्मिणीबाईंचं माहेर एकच आळंदी. या कावेरी आक्कांचं घरही सिद्धोपंत कुलकर्ण्यांच्या, म्हणजे रुक्मिणीबाईंच्या वडिलांच्या घराजवळच. म्हणूनच या कावेरीअक्कांना रुक्मिणी आणि तिच्या कुटुंबाबद्दल विशेष स्नेह होता. समाजाच्या या बहिष्कारातूनही हे कुटुंब जात असताना कुठून ना कुठूनतरी कोणत्या ना कोणत्या मार्गाने या कावेरीअक्का या कुटुंबाला मदत करीत. विठ्ठलपंत आणि रुक्मिणी यांनी गंगेत आत्मसमर्पण केलं आहे, हे कळल्यापासून त्यांच्या जिवाची अगदी घालमेल सुरू होती. धावत जावं आणि या अनाथ, पोरक्या, निष्पाप मुलांना पोटाशी धरावं, असं त्यांना सारखं वाटत असे; पण विनायकबुवांनी, त्यांच्या मुलानं त्यांना अडवलं होतं. प्रसंग ताजा होता; कुणास ठाऊक ब्रह्मवृंद यावर काय प्रतिक्रिया देतो ते? तोवर शांत बसणंच क्रमप्राप्त होतं. नपेक्षा विनायबुवांच्या कुटुंबावरही बहिष्कार टाकला गेला असता. आणि मग या चार लेकरांना मदत करणं मनात असूनही शक्य झालं नसतं. म्हणूनच कावेरीअक्का शांत होत्या. गंगेवर पाणी भरायला जाता–येता त्या या मुलांची चाहूल घ्यायच्या. त्यांना वाटलं होतं की, आई–वडील गेल्यावर ही उघडी पडलेली चार भावंडं झोपडीच्या दारात दीनवाणी बसलेली आपल्याला दिसतील; पण तसं काहीच झालं नव्हतं, त्यामुळेही या भावंडांनी काय केलं असेल? काय खाल्लं असेल, सोपान–मुक्ता तर अगदीच लहान आहेत त्यांचं कोणी केलं असेल, या विचारानं कावेरीअक्कांच्या उरात घालमेल होत होती. आज मघाशी नदीवर पाणी भरायला जाताना सोपान–मुक्ताचे हसण्याच आवाज त्यांच्या कानांवर पडले होते. त्या थोड्या निश्चिंत झाल्या होत्या. ''हं पोरं सावरलेली दिसताहेत !'' म्हणत नदीवर गेल्या होत्या; पण परतताना आता मात्र त्यांना मुक्तीच्या रडण्याचा आवाज ऐकायला आला आणि नंतर त्याच आवाजात सोपानाचाही रडण्याचा आवाज मिसळला गेला. मग मात्र त्यांना रहावलं नाही. भरलेली घागर तशीच पायरीवर ठेवून त्या गडबडीने झोपडीत आल्या. समोरचं दृश्य पाहून त्यांना हसावं की रडावं, ते कळेना. सोपानाच्या हातात तुटकी फणी होती. त्यात काही केस अडकलेले दिसत होते. मुक्ताचे केस अडकलेले दिसत होते. मुक्ताचे केस मोकळे होते आणि वेडेवाकडे विंचरलेले दिसत होते. काळा गोफ एका बाजूला पडला होता. आणि दोघंही रडत होती. ते दृश्य पाहिल्यावर काय झालं असावं, ते अक्कांच्या क्षणात लक्षात आलं. मुक्तीची वेणी घालण्याचा सोपानानं असफल प्रयत्न केला असावा. त्यांच्या मुद्रेवर हसू उमटलं आणि

डोळ्यांत माया. क्षणार्धात पुढे होऊन त्यांनी त्या रडणाऱ्या दोन अश्राप जिवांना पोटाशी धरलं. मायेची ऊब मिळताच दोघांचा हुंदका आणखीच वाढला. अक्का काही न बोलता नि:शब्दपणे दोघांच्या पाठीवरून हात फिरवत राहिल्या. काही वेळानं दोघांच्या रडण्याचा आवेग ओसरला. सोपान अक्कांच्या मिठीतून बाजूला झाला. मुक्ती मात्र अजूनही त्यांच्या मिठीतच मुसमुसत होती. जणू अक्कांच्या मिठीत आईला शोधत होती. अक्कांनाही गहिवरून आलं. त्या मूकपणे मुक्तीच्या पाठीवरून हात फिरवत राहिल्या. डोळ्यांत अश्रू आणि उरात भरभरून आलेली माया घेऊन.

(क्रमश:)

**– सौ. मंजुश्री गोखले,**

मो. ८८०५३५५२००

## कोल्हापूर चित्पावन संघातर्फे सभासद संपर्क अभियान

आपले संघाचे जवळपास १०२० आजीव सभासद आहेत. सुमारे ५८ वर्षांपासून सभासद नोंदणी अर्ज संस्थेकडे उपलब्ध आहेत. पण कालानुरूप बदल झाल्याने त्यात अनेक संदर्भ, माहिती आवश्यक आहे. जेणे करून संघाला पुढील २५ वर्षांचे नियोजन करणे शक्य होईल. तसेच अनेक सभासद नोंदणी अर्ज जीर्ण झाल्याने त्याचे संकलन अवघड झाले होते पण, आपले हितचिंतक, मार्गदर्शक श्री. प्रसाद खाडिलकर यांनी त्याची जबाबदारी घेऊन ते अमेरिकेला गेले असता सर्व अर्जातील माहिती अद्ययावत सॉफ्टवेअरमध्ये पूर्णपणे भरुन संस्थेला सर्व सभासद यादी परिपूर्ण करून दिली आहे. हे सॉफ्टवेअर श्री. प्रसाद खाडिलकर यांनी संस्थेला विनामोबदला तयार करुन दिले आहे, त्याबद्दल कोल्हापूर चित्पावन संघ त्यांचे सदैव ऋणी राहील. हे सॉफ्टवेअर अद्ययावत करण्यासाठी आपण संघाचे कार्यालय, अथवा २ ऑक्टोबर, २०२२, रविवारी या दिवशी आपली माहिती आमचे प्रतिनिधींना देऊन यादी अद्ययावत करण्यास सहकार्य करावे. तरी आपले सहकार्य अपेक्षित. पुनश्च श्री. प्रसाद खाडिलकर यांना धन्यवाद.

**महाप्रसादासाठी येणारा अपेक्षित अंदाजे खर्च (रुपयांत)**

| | | |
|---|---|---|
| १) | तांदुळ व डाळ | १०,००० |
| २) | रवा व कणिक | ४,५०० |
| ३) | साखर | ४,००० |
| ४) | बेसन पीठ | ३,००० |
| ५) | तेल डबे | ९,००० |
| ६) | वनस्पती तेल | ८,००० |
| ७) | मसाले व इतर वस्तू | ९,००० |
| ८) | ड्रायफ्रुटस् | ५,००० |
| ९) | दूध | २,००० |
| १०) | दही | २,००० |
| ११) | चहा, कॉफी, मसाला | १,८०० |
| १२) | भाजीपाला | ४,००० |
| १३) | बटाटे, फळे | ३,००० |
| १४) | नारळ | १,००० |
| १५) | गॅस सिलेंडर | ५,००० |
| १६) | मिनरल वॉटर | २,००० |
| १७) | तूप | ३,००० |
| १८) | खवा व इतर डेअरी माल | २,००० |
| १९) | पक्वान्न (गोड पदार्थ) | १५,००० |
| २०) | मजुरी | ३०,००० |

---

कोल्हापूर - येथील कोल्हापूर चित्पावन संघातर्फे दरवर्षी अनेक सामाजिक, विद्यार्थी हितार्थ नवनवे उपक्रम राबविण्यात येतात. त्या अंतर्गत संघाचे उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे, संचालक, श्री. किरण जोशी व श्री. मकरंद करंदीकर यांनी अनेक उपक्रम, परिसर पाहणी, गरजू विद्यार्थ्यांचा आर्थिक स्तर, भौगोलिक परिस्थिती, शाळेची गरज इत्यादी गोष्टींचा अभ्यास करून आंबा, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर येथील श्री अंबेश्वर माध्यमिक विद्यालय, आंबा यांची निवड केली. सदर शाळेत ४५० विद्यार्थी पटसंख्या असून ८ कि.मी. पासून दुर्गम व ग्रामीण भागातून विद्यार्थी-विद्यार्थीनी विद्यार्जनासाठी येतात. या भागात दुसरी माध्यमिक शाळा नसल्याने या शाळेला नियोजनबद्ध वस्तूरूप मदत देण्याचे निश्चित करण्यात आले. त्या अनुषंगाने या शाळेतील मुलांना दूरवरून येण्यास साहाय्य म्हणून १० सायकल (रोटेशन पद्धतीने वापर), इ. ९ वी व १० वी ची क्रमिक पुस्तकांचे २० सेट, शाळाबाह्य पुस्तकांची भेट, क्रीडा साहित्यामध्ये दोन कॅरम बोर्ड, ५ फुटबॉल, ३ व्हॉलीबॉल, ५ सेट बुद्धिबळ, १० रबरी रिंग, २ थाळी, १० फ्लाईंग डिस्क, १० दोरीच्या उड्या, २ भाले, २० नग लेझीम, इंटरनेट फॅसिलिटी (२ वर्षे) इत्यादी शालोपयोगी वस्तुंचे वाटप करण्यात आले. संघाचे उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे आणि सहकार्यामुळे त्यांचे इतर सहकारी श्री. प्रकाश पत्की, श्री. हसमुखभाई शहा, श्री. हेमांग शहा (सर्व प्रतीथयश बांधकाम व्यावसायिक) यांनी आर्थिक/वस्तूरूप मदत करून या उपक्रमात सहभाग नोंदविला. संघाचे हे नेटके नियोजन पाहून अनेक हितचिंतक आपल्या कार्यात सहभागी होत आहेत.

चित्पावन महिला आघाडीच्या वतीने ४५० विद्यार्थ्यांना १ राजगिरा लाडू पाकीट, १ भडंग पाकीट, १ सफरचंद असा खाऊ वाटप कार्यक्रम संपन्न झाला. खाऊ वाटपाचा हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रामुख्याने सौ. अश्विनी भिडे, सौ. माधुरी करंदीकर, सौ. अर्चना दातार, सौ. रेखा जोशी, सौ. संगीता आपटे, विद्या जोशी यांनी आर्थिक मदत केली. हा कार्यक्रम दि. २३ ऑगस्ट, २०२२ रोजी दुपारी १२ वाजता आंबा येथे संपन्न झाला. संघाचे अध्यक्ष श्री. नंदकुमार मराठे, उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे, संचालक सर्वश्री किरण जोशी, संतोष साने, मकरंद करंदीकर, मोहन दातार तसेच महिला आघाडी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागतगीताने झाली. प्रास्ताविक, मान्यवरांचे मनोगत, सत्कार व त्यानंतर वस्तू वाटप असा कार्यक्रम संपन्न झाला. कोल्हापूर चितपावन संघाचे अध्यक्ष श्री. नंदकुमार मराठे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना संस्थेची वाटचाल तसेच विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या.

कोल्हापूर चित्पावन संघाच्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक शाहूवाडी परिसरात झाले व शाळेच्या संचालकांनी गरजू विद्यार्थ्यांना संघाने केलेल्या वस्तूरूप भेटीचा आदराने उल्लेख करून प्रत्यक्ष परमेश्वरानेच सदर भेटी पाठविल्याचे नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनील गद्रे यांनी केले. आभार ए. टी. पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन दीपक साठे यांनी केले. या कार्यक्रमास अंबेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मानसिंगराव गायकवाड, उपाध्यक्ष बाळासाहेब गद्रे, प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक हसमुखभाई शहा, हेमांग शहा, प्रकाश पत्की, किरण जोशी, चितपावन संघाचे अध्यक्ष नंदकुमार मराठे, उपाध्यक्ष प्रसाद भिडे, कार्यवाह केदार जोशी, संचालक मकरंद करंदीकर, मोहन दातार, सौ. अश्विनी भिडे, सौ. मधुरा करंदीकर, सीएस सौ. वरदा भिडे, वास्तुविशारद सौ. क्षितीजा पत्की, सौ. पंकजा गोरे, सौ. रेखा जोशी, सौ. संगीता आपटे,विद्या जोशी, सौ. किन्नरी शहा, सौ. प्रविणा शहा, मुख्याध्यापक एन. बी. पाटील, शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, आणि विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तणावमुक्त दीर्घकालीन स्मरणशक्तीसाठी प्राचीन भारतीय तंत्र

## (लेखांक आठवा)

संतोष आणि मृखंड सर्व वयोगटांसाठी मेमरी तंत्र या विषयावरील दुसऱ्या सत्रात सहभागी झाले होते. प्रशिक्षकाने स्पष्ट केले. भारताला प्राचीन काळापासून शिकण्याची आणि शिक्षणाची समृद्ध परंपरा आहे. हे तोंडी किंवा लेखी माध्यमातून पिढ्यानपिढ्या सुपूर्द केले गेले. जीवनाचे एक निश्चित उद्दिष्ट होते, एक आदर्श होता आणि ज्याची प्राप्ती सर्व भौतिक उपलब्धींच्या पलीकडे होते. प्राचीन भारतातील शैक्षणिक उत्क्रांती देखील याच आदर्शावर आधारित होती.

संतोषने या अद्भुत सत्रातील शिकण्या संपदासोबत शेअर करण्यास सुरुवात केली, तो इतका उत्साही होता की रात्रीच्या जेवणाकडे त्याच्याकडून फारसे लक्ष वेधले गेले नाही. त्यांनी पुढे जाऊन त्यांच्या बाळाच्या स्मरणशक्तीच्या विकासाच्या शक्यता समजावून सांगितल्या आणि म्हणाले, पालक म्हणून आपण दोघांनी आधी त्यातील बारकावे समजून घेतले पाहिजेत, त्याचा सराव केला पाहिजे आणि मग आपल्या बाळाला योग्य तंत्राने प्रशिक्षित करता येईल.

संतोष पुढे म्हणाले, विद्या किंवा ज्ञानाची सर्व क्षेत्रे दोन विस्तृत प्रवाहांमध्ये विभागली गेली होती- परविद्या - उच्च परिमाण, आध्यात्मिक शहाणपण आणि अपविद्या - निम्न परिमाण, भौतिक विज्ञान. येथे आरामदायी जीवन जगण्यासाठी अपारविद्या आवश्यक आहे आणि परविद्या परलोकासाठी पूर्णपणे तयार होण्यास मदत करते. त्यामुळे सभ्यता आणि संस्कृती या दोन्हींचे संस्कार व्हावेत यासाठी दोघांच्या समतोल संयोजनाचा सल्ला दिला जातो. प्राचीन भारतीय शिक्षण हे भारतीय ज्ञानशास्त्रीय आणि तात्विक परंपरांच्या पायावर काटेकोरपणे विकसित झाले होते.

मेमरी ही मेंदूची भूतकाळातील किंवा सध्या घडत असलेल्या घटना आणि माहिती धारण करण्याची क्षमता आहे, जेणेकरून भविष्यात, गरजेच्या वेळी त्यांचा उपयोग केला जाऊ शकतो. स्मरणशक्ती ही केवळ गोष्टी जशीच्या तशी ठेवण्यापुरतीच नाही, तर ती एक अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया आहे ज्यामध्ये विविध पायर्या आहेत ज्याद्वारे माहितीवर प्रक्रिया केली जाते, त्यामुळे तिचा उपयोग अनुकूलन आणि शिकण्याच्या प्रक्रियेला सुलभ करण्यासाठी केला जाऊ शकतो.

संतोषने त्यांनी शिकलेले पहिले, अतिशय सोपे पण महत्त्वाचे तंत्र पठण समजावून सांगायला सुरुवात केली. प्राचीन भारतात, गुरुकुलातील विद्यार्थी पहाटेच्या वेळी वैदिक स्तोत्रांचे पठण सुरू करायचे. मंत्रांचा जप एक ललित कलेच्या रूपात विकसित झाला होता. शब्द, पद किंवा अगदी अक्षरांच्या अचूक उच्चारावर गुरु विशेष लक्ष देत असत. गुरूंनी शिष्याला नियमबद्ध आणि विहित उच्चाराद्वारे वैदिक ज्ञान दिले होते, जे वैकल्पिकरित्या ऐकून विद्यार्थी स्मरण-शक्तीसाठी वचनबद्ध होते.

प्राचीन भारतीय शिक्षण सिद्धांतानुसार, ज्ञान संपादन करण्यासाठी मनाचे प्रशिक्षण आणि विचार करण्याची प्रक्रिया आवश्यक आहे. वाचन हा कोणताही मजकूर शिकण्याच्या सर्वात महत्वाच्या आणि प्रभावी पद्धतींपैकी एक आहे. पठणाची स्वतःची लय, संगीत, ध्वनी आणि ठोके असतात जे भाषेच्या विकासासाठी, संज्ञानात्मक विकासासाठी आणि भावनिक विकासासाठी खूप उपयुक्त असतात. एक प्रसिद्ध शिक्षक, वेई शुशेंग यांच्या मते, अधिक पाठ केल्याने भाषेची भावना देखील मजबूत झाली आहे. गाणे शिकण्यासाठी कार्यशाळेत वापरल्या जाणार्या तंत्रात सोप्या सूचना दिल्या आहेत - समजा गाण्यात प्रत्येकी ४ ओळींचा श्लोक आहे, लक्षात घ्या की वाचा म्हणजे पहा आणि मोठ्याने म्हणा तर पठण म्हणजे स्मृतीतून लक्षात ठेवून डोळे बंद करून मोठ्याने

म्हणा... तंत्राच्या सोप्या पायऱ्या आहेत
श्लोक १ : पायरी १ : ओळ-१ तीन वेळा वाचा
पायरी २ : ओळ-२ तीन वेळा वाचा
पायरी ३ : गट म्हणून तीन वेळा ओळ- १,२ पाठ करा
पायरी ४ : ओळ-३ तीन वेळा वाचा
पायरी ५ : ओळ-४ तीन वेळा वाचा
पायरी ६ : गट म्हणून तीन वेळा ओळ- ३,४ पाठ करा
पायरी ७ : पूर्ण श्लोक म्हणून ओळ- १,२,३,४ तीन वेळा पाठ करा
पायरी ८ : श्लोक २ साठी चरण १ ते ७ ची पुनरावृत्ती करा
पायरी ९ : श्लोक १ आणि २ एकत्र तीन वेळा पाठ करा.

कविता संपेपर्यंत असेच चालू ठेवा, कदाचित दररोज एक श्लोक जोडला जाईल.

अशा प्रकारे प्रत्येक वेळी नवीन माहितीच्या फक्त १-२ ओळी जोडल्या जातात आणि नंतर ओळींच्या मागील संचाशी जोडल्या जातात जेणेकरून मेंदूवर ताण येत नाही. ताल अधिक सहज लक्षात ठेवण्यास मदत करते. तसेच सुरुवातीच्या ओळी अनेक वेळा पुनरावृत्ती होत असल्याने ते विसरणे कठीण होते.

हे तंत्र गणितीय तक्ते, सूत्रांचा संच, स्पर्धेसाठी भाषण इत्यादीसाठी वापरले जाऊ शकते. एकदा का पठण तंत्र वापरून शिकले की, एखाद्याला विराम द्यावा लागला तरी तो सहज त्या बिंदूपासून पुढे चालू ठेवू शकतो जसा पठण करताना, ओळी जोडणे होते. इतके कुशलतेने केले की कोणताही बिंदू प्रारंभ बिंदू होऊ शकतो.

जेव्हा मंत्र अशा प्रकारे शिकला जातो आणि नंतर दररोज सराव केला जातो तेव्हा अगदी विष्णु सहस्र नाम सारखे मंत्र ज्यात शंभराहून अधिक ओळी आहेत, प्रयत्न आणि चूक न करता सहजपणे जप करता येतो. जेव्हा आम्ही घरी पूजा करतो, तेव्हा आम्ही पाहिले आहे की पुजारी कोणतीही चूक न करता एक तास मंत्रजप करू शकतात, मधेच आम्हाला पूजा करण्याच्या सूचना देखील देतात आणि ते ते अगदी सहजतेने आणि मोठ्या विश्वासाने करतात. याचे कारण असे की या पुरोहितांना त्यांच्या लहानपणापासूनच अनेक मंत्रांचे पठण करण्याचे विशेष प्रशिक्षण मिळाले होते. शिकत असताना योग्य दृष्टीकोन आणि नंतर नियमित जप केल्याने मेंदूतील मंत्र, गाणी किंवा गणिताची तक्ते सुप्त स्मरणातून ऑटो रिपीट मोडमध्ये नेली जातात.

डॉ जेम्स हार्टझेल यांनी सायंटिफिक अमेरिकन जर्नलमध्ये संस्कृत मंत्र जप करण्याबद्दल त्यांचे वैज्ञानिक निरीक्षण नोंदवले आहे. या न्यूरोसायंटिस्टने संस्कृत इफेक्ट ही संज्ञा तयार केली आहे. ते लिहितात की वैदिक मंत्रांचे स्मरण केल्याने स्मरणशक्ती (अल्पकालीन आणि दीर्घकालीन दोन्ही) सारख्या संज्ञानात्मक कार्याशी संबंधित मेंदूच्या क्षेत्रांचा आकार वाढतो. ते त्यांच्या अहवालात लिहितात की भारतीय परंपरा असे मानते की मंत्रांचे कठोरपणे स्मरण आणि पठण केल्याने स्मरणशक्ती आणि विचारशक्ती वाढते. त्याने हे देखील दाखवले की मेमरी प्रशिक्षणार्थींनी कॉर्टिकल जाडी वाढवली आहे जी नियंत्रणे करतात. ज्याप्रमाणे शारीरिक व्यायाम आपल्या मेंदूला मदत करतो त्याचप्रमाणे नामजपाचा मानसिक व्यायाम आपल्या मेंदूला मदत करतो. शब्द कोडी आणि खेळ यासारख्या क्रियाकलाप, भाषा शिकणे (पुन्हा शिकणे), संगीताचा सराव करणे, ग्रेगोरियन किंवा वैदिक ग्रंथांचा जप करणे (परंतु योग्य मीटरमध्ये) आणि आपला मेंदू अद्याप तरुण असू शकतो.

संतोषने आपले भाषण सामान्यत: कमी समजलेल्याी आणि दुर्लक्षित असलेल्या परंतु मेंदूचा विकास समजून घेण्या च्यार अतिशय महत्वाल च्या् विषयाने संपवला, ज्याला विसरण्याची क्षमता म्हणतात. कल्पना करा जर पाच ज्ञानेंद्रिये सतत माहिती पुरवत असतील आणि ती मेंदूद्वारे साठवली गेली तर आपल्याला आवश्यक माहिती मिळवण्यात अडचण येईल. मेंदूमध्ये विसरण्याची नैसर्गिक क्षमता असते. याचा अभ्यास केला गेला आणि एबिंगहॉस विसरणे वक्र म्हणून स्पष्ट केले गेले. नवीन माहिती

मिळाल्यानंतर, आपल्या मेंदूचा मध्यवर्ती टेम्पोरल लोब सहसा ती माहिती काही दिवस किंवा आठवडे स्मृतीमध्ये जतन करण्यास सक्षम असतो. परंतु, अंतराची पुनरावृत्ती किंवा सक्रिय आठवण यासारख्या पद्धती वापरल्याशिवाय, आपला मेंदू मेमरी ट्रेस क्षय आणि हस्तक्षेपामुळे ती स्मृती जास्त काळ साठवू शकणार नाही. सामान्यतः विसरणे म्हणून ओळखली जाणारी प्रक्रिया. विस्मरण कर्वचे स्पष्टीकरण असे सांगते की, आज शिकलेल्या माहितीचे पहिल्या २४ तासांत पुनरावलोकन केले नाही तर विसरण्याची शक्यता ९०% आहे, पुढील पुनरावलोकने १० दिवस, ३० दिवस, ९० दिवस आणि नंतर ३६५ दिवसांच्या आत असावीत. विसरण्याची वक्र कापून अंतराने पुनरावलोकन केले, तरच मेंदूला दीर्घकालीन तथ्ये किंवा संकल्पना लक्षात ठेवणे शक्य आहे. या विस्मरणाच्या वक्रतेचे निखळ प्रमाण उल्लेखनीय आहे आणि कोणत्याही विद्यार्थ्यासाठी आणि शिक्षकांसाठी ते ऑफलाइन किंवा ऑनलाइन शिक्षण वातावरणात असले तरीही त्याच्या परिणामांचा सामना करणे हे सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे. तथापि, सर्व विसरणे वाईट नाही. खरं तर, विसरणे ही मानवी स्मरणशक्तीमध्ये महत्त्वाची भूमिका असते कारण यामुळे दीर्घकाळ टिकून राहण्याचे प्रमाण वाढते. यामुळेच शाळा विद्यार्थ्यांना होमवर्क सेट करून माहितीच्या पुनरावृत्तीला मदत करतात - २४ तासांच्या आत, साप्ताहिक, मासिक, त्रैमासिक आणि वार्षिक परीक्षा जेथे विद्यार्थी नैसर्गिकरित्या शिकलेल्या धड्यांची उजळणी करतो आणि यामुळे विसरण्याची वक्र कमी करण्यास मदत होते आणि दीर्घकालीन स्मृती सुनिश्चित करते.

संपदा लक्षात ठेवण्याच्या आणि विसरण्याच्या प्रक्रियेबद्दल शिकून थक्क झाल्या. तिने आणि संतोषने एकमेकांना वचन दिले की दर आठवड्याला एक मंत्र किंवा कविता शिकू आणि नंतर हे तंत्र वापरून आपल्या मुलाला शिकवू.

**- इंद्राणी केळकर,**

मोबा. ९९६४६८५०६७

## सांगा पाहू उत्तरे

१. पोलंडमधील वॉर्सा शहर 'विस्तुला' नदीच्या काठी वसले आहे.
२. अरगॉन या निष्क्रिय वायूचा शोध लॉर्ड रेले या इंग्लंडच्या शास्त्रज्ञाने लावला.
३. रेशमाच्या किड्यांना 'पेब्रिन' हा रोग 'नोझेमा बॉम्बिसिस' या जीवाणूंमुळे होतो.
४. खानदेशातील 'गौताळा' अभयारण्य सातमाळा -अजिंठा या डोंगररांगांमध्ये वसले आहे.
५. ओरिसातील सुप्रसिद्ध गोड पदार्थ आहे 'छेना पोडा'.
६. इंग्लंडमध्ये लहान शहरात किंवा खेडेगावात क्रिकेट जिथे खेळले जाते त्या जागेला/मैदानाला 'व्हिलेज ग्रीन' असं म्हणतात.
७. आईसलँड देशाची राजाधानी आहे 'रेकॅव्हिक'.
८. 'शांघाय' या शब्दाचा शब्दशः अर्थ आहे 'समुद्रावर वसलेले शहर'.
९. कटकट, भांडणं व आरडाओरडा यामुळे 'कॉर्टिसॉल' हे ताणकारक व रोग वाढवणारे रसायन तयार होते.
१०. शरीरातील मज्जातंतूंवर 'मायलीन' नावाचे आवरण असते.

**- सौ. मधुरा संतोष शिधये,**

मोबा. ९८१९७७०९७०


**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**

# गोखले ब्रदर्स

**सराफी दुकान**

**बुधवार, दि. 5 : विजयादशमी**
**मंगळवार, दि. 18 : पुष्य नक्षत्र**
**रविवार, दि. 23 : धनत्रयोदशी**
**बुधवार, दि. 26 : दीपावली पाडवा**

आपलं दुकान
**महाद्वार रोडवर,**
**0231-2546585**

# आयकर विवरणपत्र (Income Tax Return) वेळेत भरले नाही? अजून आयकर विवरणपत्र भरता येऊ शकते का?

मूल्यांकन वर्ष (Assesment Year) 202223 साठी आयकर विवरणपत्रा (ITR) भरण्याची अंतिम तारीख 31.07.2022 (Due Date) ही पगारदार कर्मचारी, व्यक्ती आणि HUF ज्यांच्या खात्यांचे लेखापरीक्षण (Audit) करण्याची आवश्यकता नाही त्यांच्यासाठी आयकर विवरणपत्रा (ITR) दाखल करण्याची शेवटची तारीख होती.

त्याचबरोबर ज्यांना ऑडिटची गरज आहे, त्यांच्यासाठी आयकर विवरणपत्र (ITR) भरण्याची शेवटची तारीख 31 ऑक्टोबर 2022 आहे आणि ज्यांना ट्रान्सफर प्रायसिंग (Transfer Pricing) रिपोर्टची आवश्यकता आहे, त्यांच्यासाठी आयकर विवरणपत्र (ITR) भरण्याची शेवटची तारीख 30 नोव्हेंबर 2022 आहे.

देय तारीख (Due Date) ही अशी तारीख होती ज्याद्वारे कोणतेही विलंब शुल्क किंवा दंड न भरता विवरणपत्र (ITR) दाखल केले जाऊ शकत होते.

हे समजून घेतले पाहिजे की, सध्या भरत असलेले रिटर्न तुम्ही आर्थिक वर्ष (Financial Year) 2021-22 मध्ये कमावलेल्या उत्पन्नाासाठी आहे, म्हणजे. 1 एप्रिल 2021 आणि 31 मार्च 2022 दरम्यान कमावलेल्या उत्पन्नाासाठी. मूल्यांकन वर्ष 2022-23 (Assessment Year 2022-23) हे ते वर्ष असेल ज्यामध्ये तुम्ही तुमचे आयकर विवरणपत्र (ITR) भरता आणि कर मूल्यांकनासाठी उत्पन्ना घोषित करता. आर्थिक वर्ष 2021-22 दरम्यान कमावलेल्या उत्पन्नासाठी, मूल्यांकन वर्ष हे लगेचच पुढील वर्षी असेल, म्हणजे 1 एप्रिल 2022 ते 31 मार्च 2023 असेल.

31 जुलैपर्यंत आयकर विवरणपत्र (ITR) भरणे चुकलेले करदाते आता उशीरा रिटर्न भरू शकतात. मागील वर्षासाठी विलंबित रिटर्न (Belated Return) संबंधित मूल्यांकन वर्ष (Assessment Year) संपण्याच्या तीन महिने आधी (म्हणजे 31.12.2022) किंवा मूल्यांकन पूर्ण होण्यापूर्वी, यापैकी जे आधी असेल तोपर्यंत कधीही दाखल केले जाऊ शकते. देय तारखेनंतर रिटर्न भरणाऱ्या करदात्यांना कलम 234 अ अंतर्गत व्याज आणि कलम 234 फ अंतर्गत दंड (Late Fee) भरावा लागेल.

**आयकर विवरणपत्रा (ITR) भरण्याची अंतिम मुदत चुकल्यास काय होईल?**

**व्याज (Interest) :** जर तुम्ही तुमचा रिटर्न देय तारखेनंतर भरला, तर तुम्हाला कलम 234अ अंतर्गत कर देयकावर 1 टक्के दरमहा दराने व्याज देखील द्यावे लागेल. आयटीआर दाखल करण्याची शेवटची तारीख संपल्यापासून आपल्याला हा व्याज दर भरावा लागेल.

**विलंब शुल्क (Late Fee) :** विलंब शुल्क रु.5000 कलम 234 फ भरावे लागतील. एकूण उत्पन्न 5 लाखांपेक्षा कमी असल्यास विलंब शुल्क रु.1,000 असेल.

**तोटा समायोजन (Loss Carry Forward/ Adjustment) :** जर तुम्हाला शेअर बाजार, म्युच्युअल फंड, मालमत्ता किंवा तुमच्या कोणत्याही व्यवसायातून तोटा झाला असेल, तर तुम्ही ते पुढे नेऊ शकता (Carry Forward) आणि पुढील वर्षाच्या उत्पन्नासह ते समायोजित (Adjust) करू शकता. हे तुमचे कर दायित्व लक्षणीयरीत्या कमी करण्यात मदत करते. जर तुम्ही तुमच्या आयकर विवरणपत्र (ITR) मध्ये तोटा घोषित केला आणि अंतिम मुदतीपूर्वी आयकर विभागाकडे तो दाखल केला तरच नुकसान समायोजनास (Loss Adjustment) परवानगी आहे. विलंबित आयकर विवरणपत्राच्या (ITR) बाबतीत, एखादी व्यक्ती तोटा पुढे नेऊ शकत नाही (घराच्या मालमत्तेतील उत्पन्ना वगळता).

जर तुमची आयकर विवरणपत्र (ITR) फाइल करण्याची देय तारीख चुकली असेल, तर तुम्ही देय तारखेनंतर रिटर्न दाखल करू शकता, याला विलंबित रिटर्न (Belated Return) म्हणतात. परंतु तरीही, तुम्हाला विलंब शुल्क, व्याज भरावे लागेल आणि भविष्यातील समायोजनासाठी तोटा पुढे नेण्याची परवानगी दिली जाणार नाही. या वर्षासाठी, तुम्ही 31 डिसेंबर 2022 पर्यंत विलंबित रिटर्न भरू शकता.

आयकर विवरणपत्रा (ITR) भरण्याचे फायदे पुढील लेखात जाणून घेऊया. (क्रमशः)

– **श्री. महेश दामले** (चार्टर्ड अकाउंटंट)

# कोल्हापूर चितपावन संघातर्फे घरपोच प्रसाद योजना

आपल्या संघाच्या वतीने रविवार दि. 2 ऑक्टोबर 2022 रोजी पंचागानुसार अष्टमी जागर सोहळा आयोजित केला आहे. सध्याच्या परिस्थितीत अनेक भाविकांना दर्शनासाठी येणे शक्य होत नाही. विशेषतः घरातील ज्याष्ठ मंडळी, लहान मुले, गर्भवती महिला आदि कुटुंबातील सदस्य इच्छा असूनही येऊ शकत नाहीत. म्हणूनच आपल्या संघाच्यावतीने 'श्रीं' चा प्रसाद आपल्या घरी पोहोचविण्याचा संकल्प केला आहे. यामध्ये हळद-कुंकू, लाडू, फुटाणे व सुरक्षित पिशवी यांचा समावेश आहे. तसेच आपल्या कुटंबाच्या कल्याणासाठी संकल्प केला जाईल.

यासाठी आपण रविवार दि. 25 सप्टेंबर 2022 पर्यंत नोंदणी केल्यास प्रसाद आपल्या घरी बुधवार दि. 5 ऑक्टोबर 22 पासून 4-5 दिवसात घरपोच मिळेल. यासाठी एका प्रसादासाठी देणगी शुल्क केवळ रु. 351 देण्याची विनंती करीत आहोत. आपण 1) ज्याच्या नावे प्रसाद घरपोच हवा असेल त्याचे संपूर्ण नांव व पत्ता, व्हॉटस्‌अॅप नंबर. 2) गोत्र व प्रसादाची संख्या ही माहिती कळवावी.

देणगी शुल्क रोखीने संघाच्या किंवा श्री परशुराम पतसंस्थेच्या कार्यालयात अथवा संघाच्या अधिकृत बँक खात्यात जमा करु शकता. बँकेचे नाव - बँक ऑफ महाराष्ट्र, बँकेची शाखा - महाद्वार रोड, कोल्हापूर. खाते नंबर - 20128506183 खऋडउ उेवश - चअक्ष0000326 कृपया बँकेत पैसे जमा केल्यास रिमार्क जागेत आपले नाव अवश्य लिहावे. संघाचे कार्यवाह श्री. केदार जोशी यांच्या 7588839527 या नंबरवर गुगल पे द्वारे देणगी शुल्क जमा करु शकता. आपण आपला संदर्भ नमूद करावा. देणगी शुल्क जमा केल्यावर युटीआर अथवा फोन करुन कळवावे. नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क : सहकार्यवाह संतोष साने 8459019091, संचालक श्रीकांत लिमये 9423880380, संचालक हृषिकेश लिमये 9404260470. आपण वेळेत नोंदणी करुन या ''घरपोच प्रसाद योजनेचा'' लाभ घ्यावा असे आवाहन संघाचे अध्यक्ष श्री. नंदकुमार मराठे व कार्यवाह श्री. केदार जोशी यांनी केले आहे.

**परशुराम पतसंस्था कार्यालयीन वेळ**
**सकाळी १०.०० ते सायं. ५.००**
**देवघेवीची वेळ**
**सकाळी १० ते ४.३० पर्यंत**

## योगवर्गाचे आयोजन

शिवाजी पेठ, मंगळवार पेठ, महाद्वार रोड, अंबाबाई मंदिर परिसरातील नागरिकांसाठी योग विद्याधाम, कोल्हापूर आणि कोल्हापूर चित्पावन संघ यांचे संयुक्त सहकार्याने कोल्हापूर चित्पावन संघ हॉल, गुरुमहाराज वाड्यानजीक, मिरजकर तिकटी, कोल्हापूर येथे रोज सकाळी ६ ते ८ या वेळेत योगासन वर्ग सुरू झाले आहेत. तरी इच्छुक योगसाधकांनी सदर वर्गाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी खालील नंबरवर संपर्क साधावा.

**सौ. सिद्धी बकरे - 8275606627,**
**श्री. रोहित गवळी - 9657963475**

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते**
**चित्पावन संघाच्या कार्यालयात**
**७६२०५४६२२५ या व्हॉटस् अॅप क्रमांकावर**
**लौकरात लौकर पाठवावेत.**

## ब्राह्मण समाज 'अभिमानास्पद व्यक्ती गौरव !'

# श्रीमती मालती मेहेंदळे, ठाणे



काही माणसं जगावेगळी असतात. त्यांना भेटलं की मन एकदम उल्हासित होतं. कामाप्रती असलेला त्यांचा ध्यास थक्क करतो. ठाण्यातल्या ८० वर्षांच्या मालती मेहेंदळे अर्थात मेहेंदळेआजी हेही असंच एक व्यक्तिमत्व.

लहानपणी झालेल्या एका अपघातामुळे त्यांचा चेहरा विद्रुप झाला. त्यामुळे सर्वसामान्य मुलीसारखं आयुष्य त्यांच्या वाट्याला आलंच नाही. अपघाताच्या खुणांमुळे त्या आत्मविश्वास हरवून बसल्या आणि त्यातच त्यांचं बालपणही हरवलं. त्यांनी आपल्या आयुष्याच्या सीमा आखून घेतल्या. इतरांमध्ये मिसळणं त्या जणू विसरूनच गेल्या. कशीतरी शाळा पार पडली. अर्थात शाळेत असताना त्यांनी धावणे, गोळाफेक, दोरीच्या उड्या अशा ज्या कोणत्या स्पर्धेत भाग घेतला तेव्हा त्यात पहिला नंबरच मिळवला. कॉलेजजीवनही त्यांना फारसं मानवलं नाही. त्यामुळे शिक्षणाची गाडी तिथेच थांबली.

एकदा भावाने त्यांच्यासाठी कागदी फुलं कशी बनवावीत हे दाखवणारं एक पुस्तक आणि काही कागद आणले. पुस्तक इंग्रजीत होतं आणि त्या भाषेशी त्यांची केवळ तोंडओळखच होती. माळ्यावरच्या एका रिकाम्या खोलीत त्यांनी कागदी फुलं बनवायला सुरुवात केली आणि त्यांचं आयुष्य बहरून गेलं.

कालांतराने त्यांचं लग्न झालं आणि त्या रोह्यावरून मुंबईतल्या पार्ल्यात आल्या. दोन मुली झाल्या आणि काही वर्षांनी पती अचानक वारले. त्या पुन्हा माहेरी आल्या. नंतर त्यांचा पुनर्विवाह होऊन मेहेंदळे बनून त्या ठाण्यात आल्या. चांगले दिवस सुरू झाले. त्यांचे यजमान स्वभावाने खूप चांगले होते. मधल्या काळात त्या सामाजिक कार्यक्रमात सहभागी झाल्या. 'जीवनज्योती' या पतपेढीच्या स्थापनेत त्यांचा मोठा सहभाग होता. आजींनी या संस्थेसाठी बरीच वर्षं काम केलं.

मेहेंदळेकाका अचानक गेल्यावर आजी परत फुलं बनवू लागल्या. अचानक कोणी तरी त्यांना सांगितलं की या फुलांचं आपण प्रदर्शन भरवू या. प्रदर्शन भरवण्याइतपत आत्मविश्वास त्यांच्याकडे नव्हता. त्यांच्याकडे फुलं बनवायला येणाऱ्या मुलींनी त्यांना प्रोत्साहित केलं आणि प्रदर्शन पार पडलं. एवढी सुंदर आणि जिवंत फुलं पाहून ती कागदी आहेत यावर कोणाचा विश्वासच बसेना. प्रदर्शन अत्यंत यशस्वी झालं. आजी मनातून खूप आनंदी झाल्या. जवळ जवळ पन्नास वर्षं जोपासलेल्या छंदाचं सार्थक झालं. मग मात्र आजींनी मागे वळून बघितलं नाही. नंतर एलॲण्डटी या कंपनीसाठीही त्यांनी प्रदर्शन भरवलं. तुर्भेच्या टी.आय.एफ.आर. या प्रतिष्ठित संस्थेने आजींच्या फुलांचं प्रदर्शन आयोजित केलं आणि तिथल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आजींचं खूप कौतुक केलं. मधल्या काळात फुलं बनवायला शिकण्यासाठी मेहेंदळेआजींकडे तरुण मुलींचा ओघ सुरू झाला. त्यांचा क्लास खूप लोकप्रिय झाला.

आजी नंतर अमेरिकेला गेल्या. भारतभर फिरल्या. सगळीकडची फुलं बघितली आणि घरी येऊन त्यांनी ती साकारली. आजी फक्त क्रेप पेपरचीच फुलं बनवतात. वेगवेगळ्या रंगाचे, छटांचे क्रेप पेपर शोधत असतात. क्वचितप्रसंगी त्या रंग वापरतात. कृष्णकमळ आणि बकुळ ही दोन फुलं बनवणं आव्हानात्मक आहे, असं त्या सांगतात. आज आजींना त्यांच्या या छंदामुळे अजिबात वेळ नाही. त्या एकट्या राहत असल्या तरी त्या एकट्या कधीच नसतात. परिस्थिती टोकाची प्रतिकूल असतानाही सुंदर जगावं कसं हे मेहेंदळेआजींकडे बघून सहज कळतं.

**श्रीमती मालती मेहेंदळे आजींचा संपर्क**

फोन नं ८३५६०६४७१४

# सगुण-निर्गुण गौराई !

'लोकांकडे मुखवट्याच्या गौरी, आपल्याकडे खड्यांच्या गौरी का?' हा प्रश्न बालपणी मनात घोळत असे. त्याबद्दल आईला कधी विचारलं नाही, पण हळू हळू कळलं, चित्पावनांकडे खड्यांची गौरी आणण्याची रीत असते. तरी खड्यांचीच का, हा प्रश्न अनुत्तरित होता. मात्र, हळू हळू संत वाङ्याशी संबंध आला, तेव्हा सगुण-निर्गुणाचा अर्थबोध होऊन थोडी थोडी उकल होऊ लागली.

आपल्या पूर्वजांना आपण कर्मठ ठरवून मोकळे होतो. वास्तविक, ते आपल्यापेक्षा जास्त फ्लेक्सिबल होते. कशावाचून काही अडू न देता प्रसंगी सुपारी ठेवून काम भागवण्याची कला त्यांना अवगत होती. अशाच एखाद्या प्रतिकूल परिस्थितीतून खड्यांच्या गौरीची निर्मिती झाली असावी, असं आपलं माझं मत! दगडातही देवपण शोधणारी आपली संस्कृती. निसर्गाची पूजा आणि त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करायला शिकवणारी आपली मूल्य, परंपरा आपल्याला सणांच्या निमित्ताने निसर्गाजवळ नेते.

विहीर किंवा नदीवरून पाच किंवा सात खडे आणायचे. कुमारिकांच्या हाती खडे देऊन त्यांच्यासकट गौर घरात घेताना थाळी, शंख, झान्जा (थाळीनाद पूर्वीपासून होता तर = आणखी एक उकल=) वाजवत तिचं स्वागत करायचं. घरात कुंकवाची पावलं काढायची. कुमारिकेच्या पायावर दूध पाणी घालून तिला आणि गौरीला हळद-कुंकू लावून स्वागत करायचं. स्वागत करणाऱ्याने सोन्याच्या पावलाने ये, रुप्याच्या पावलांनी ये, आनंद घेऊन ये, समृद्धी घेऊन ये म्हणत तिला घरभर फिरवायचं. कुमारिकेने हातात गौर घेऊन शांतपणे घराचं अवलोकन करायचं आणि समाधानाने देवघरात गौरीला आसनस्थ करायचं. दुसऱ्या दिवशी गौरीचा पाहुणचार, नैवेद्य वगैरे ओघाने आलं. पण हा संस्कार कितीतरी गोष्टी सांगून जातो.

खड्यांना मूर्त रूप नसतानाही, त्यात देवत्व पहायचं. म्हणजे निर्गुणातही सगुणाचा साक्षात्कार अनुभवायचा. नाकी डोळी निट्स असलेली मूर्ती मन मोहून घेते, तशीच आकार-उकार नसलेली, शेंदूर लावलेली गणपती, देवी, हनुमानाची मूर्तीही देवत्वाची प्रचिती देते आणि नतमस्तक व्हायला लावते. याचाच अर्थ असा, 'ऊस डोंगापरी, रस नोहे डोंगा, काय भूललासी वरलिया रंगा?' नुसत्या रंग-रूपावर न भाळता, गुणांची पारख करा आणि निर्गुणातही आनंद आहे, त्याचा अनुभव घ्या, अशी त्यामागची भावना असावी.

कुमारिकेचे पूजन, का? कारण ती अल्लड असते, निरागस असते, राग-लोभापलीकडे असते. वयात आल्यावर आपल्याला अनेक वासना, विकार जडतात. कुमारिकेच्या बाबतीत तसे नसते, ती बाला आनंदून गेली, तर मनापासून सदिच्छा देते, तेच आपल्या घरासाठी शुभाशीर्वाद मानायचे, असा त्याचा अर्थ असावा.

त्यानिमित्ताने सौभाग्यवतीची ओटी भरणे, गौरीबरोबर तिलाही जेवून-खाऊन तृप्त करून पाठवणे, ही तिच्या रूपाने आलेल्या गौरीची मानसपुजाच आहे. कामाच्या धबाडग्यात अडकलेल्या गृहिणीच्या नशिबात गरम गरम जेवण फारच दुर्मिळ असतं. म्हणून तर अलीकडे, ती कामाचा कंटाळा आला, की असहकार पुकारून हॉटेलमध्ये जाऊया, म्हणून घोषित करते. आयतं जेवण आणि जेवणानंतरचा पसारा आवरून मिळणे, हा तिचा मुख्य स्वार्थ असतो. पूर्वी, तशी सोय नव्हती. म्हणून सवाष्ण जेवू घातली जात असे. त्यानिमित्ताने एक वेळची, तिची कामातून, पसाऱ्यातून सुटका. घरचं सात्विक, ताजं, गोडाधोडाचं जेवण झाल्यावर आपसूक ती तृप्त होऊन यजमानांना आशीर्वाद देऊन जात असे. ज्याला आपण शुद्ध मराठीत 'पॉझिटिव्ह वाईब्स' म्हणतो. त्या मिळवण्याचा हा पारंपरिक मार्ग!

आपल्या सणांचं, परंपरांचं 'शास्त्र असतं ते' म्हणत अंधानुकरण न करता, त्यामागचा अर्थ जाणून, समजून घेतला, तर उत्सवाचा आनंद द्विगुणित होतो. मग खड्यांमध्येही गौरी दिसू लागते, तेही रंगरंगोटी न करता!

(संग्रहित)

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलींची माहिती - सप्टेंबर २०२२)

| अ. क्र. | वधूचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्राजक्ता A +ve | देशस्थ | २३/३/९८ ५.०० | वसिष्ठ, मकर, उत्तराषाढा, ३ रे अंत्य, मनुष्य | M.B.A. | --- | वा.प्रा. --- | मदन वासुदेव कुलकर्णी उचगांव, कोल्हापूर ९६२३३१९६८० |
| २. | हर्षदा O +ve | देशस्थ | १/३/९७ ५.१ | भारद्वाज, वृश्चिक २ रे मध्य, देव | B.Tech. | मुंबई येथे नोकरी | वा.प्रा. ४ लाख | विजय गोविंद जोशी मु.पो.पलुस, जि.सांगली. ८६६८३०२९८२ |
| ३. | दिव्या AB +ve | देशस्थ | २६/६/९७ ५.३ | जमदग्नि, कुंभ पूर्वाभाद्रपदा, २ रे आद्य, मनुष्य | B.E. | --- | मा.प्रा. --- | दत्तात्रय नरहर कुलकर्णी मु.पो.निपाणी. ९७३९०२२६१२ |
| ४. | पूजा AB +ve | देशस्थ | २२/५/९६ १५१ सेंमी | वसिष्ठ, कर्क पुष्य, प्रथम मध्य, देव | M.Com. | --- | मा.प्रा. --- | प्रसाद जोशी रिंग रोड, कोल्हापूर. ९३५९२४७९७३ |
| ५. | ऐश्वर्या B +ve | देशस्थ | १६/११/९५ ५.४ | जमदग्नि, सिंह मघा, १ ले मध्य, देव | Master in Physics | बेंगलोर येथे नोकरी | वा.प्रा. --- | ऐश्वर्या कुलकर्णी सोमनाथ मंदिरामागे, निपाणी ७४०६२०७५२३ |
| ६. | कांचनगौरी A +ve | देशस्थ | १८/९/९५ ५.३ | भारद्वाज, मिथुन पुनर्वसू, १ ले आद्य, देव | M.S. | Process Engg. at UK | --- | चंद्रकांत कुलकर्णी आकुर्ली रोड, कांदीवली (ब) मुंबई. ८६५२४८५३६३ |
| ७. | श्रुती O +ve | कऱ्हाडे | २४/११/९४ ५.३ | भारद्वाज, कर्क पुनर्वसू, ४ थे आद्य, देव | Engg. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. १८ लाख | विजय करमरकर टाकाळा, कोल्हापूर. ९१५८८७९३५० |
| ८. | मृणाल O +ve | कोकणस्थ | ३०/१०/९३ ५.२ | नित्युनंद, मेष, अश्विनी, ३ रे आद्य, देव | B.Tech. | बेळगांव येथे नोकरी | वा.प्रा. ४ लाख | संजय भिडे टिळकवाडी, बेळगांव. ९४८०३९८१६७ |
| ९. | कल्याणी B +ve | देशस्थ | ५/५/९२ ५.४ | काश्यप, वृषभ मृगशिर्ष, २ रे मध्य, देव | Bac Elect Antle | नोकरी | वा.प्रा. १७ लाख | अरुण इनामदार सुपर मार्केट, बेळगांव. ९४४९०६६००५ |
| १०. | आदिती B +ve | देशस्थ | ३१/१२/९२ ५.४ | विश्वामित्र, मीन पूर्वाभाद्रपदा, ४थे आद्य, मनुष्य | M.Tech. (Elect) | पुण येथे नोकरी | वा.प्रा. ५ लाख | अरुण धरणगांवकर जरगनगर रोड, कोल्हापूर ९५०३६४९३८२ |

**प्रसादिनी प्रकाश बिलुरकर** **शिक्षण :** M.C.A.
**जन्मतारीख :** ९/३/१९९५ **(देशस्थ)** (A +ve)
**नोकरी :** नाही **उंची :** ४.९
**शारीरिक व्यंग :** मानेची उंची थोडी कमी आहे.
**पत्ता : श्री. प्रकाश बिलुरकर**
शिवाजी पेठ, कोल्हापूर.
मोबा. ९९२११९०३६५, ९८५०१५८१८०
**अपेक्षा :** निर्व्यसनी, समजुतदार, ग्रॅज्युएट असावा

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| विश्वामित्र | वृषभ | मृग | दुसरे | मध्य | देव |

**श्रुती किरण पंडित** **शिक्षण :** M.Com. MBA
**जन्मतारीख :** १३/७/१९९५ **(देशस्थ)** (O +ve)
**नोकरी :** पुणे येथे **वा.प्रा. :** ५.५० लाख **उंची :** ५ फूट ५ इंच
**पत्ता : श्री. किरण पंडित**
१११, प्रकाश अपार्टमेंट, सासने कॉलनी, कोल्हापूर.
मोबा. ९८८१२५९८२१, ७०८३४३९७३७
**अपेक्षा :** शाकाहारी, कोल्हापुरात घर, समजूतदार, कुटुंबवत्सल, पुण्यात नोकरी

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| भार्गव | मकर | उत्तराषाढा | ४ थे | अंत्य | मनुष्य |

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलांची माहिती - सप्टेंबर २०२२)

| अ. क्र. | वराचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ओंकार O +ve | देशस्थ | १७/११/९१ ५.६ | हरित, कुंभ पूर्वाभाद्रपदा, २रे आद्य, मनुष्य | B.Com. | वैद्य मॅनेजमेंट सर्व्हिसेस कोल्हापूर | मा.प्रा. २५,०००/- | सुप्रिया प्रमोद कुलकर्णी अंबाई टँक, रंकाळा,कोल्हापूर ९५७९२००६३१ |
| २. | शैलेंद्र AB +ve | देशस्थ | २५/१/९२ ५.६ | भारद्वाज, कन्या हस्त, ४ थे आद्य, देव | B.E. (Mech.) | पुणे येथे नोकरी | मा.प्रा. ३५,०००/- | किशोर वसंतराव कुलकर्णी कळंबा रोड, कोल्हापूर. ७७४४०६४४१६ |
| ३. | स्वरूप O +ve | कऱ्हाडे | ६/७/९२ ५.७ | वसिष्ठ, कन्या हस्त, १ ले आद्य, देव | B.Com. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ३ लाख | सुनंदा विनायक प्रभुदेसाई शास्त्रीनगर, कोल्हापूर. ९६३७४००४५२ |
| ४. | डॉ. पवन O +ve | देशस्थ | २०/११/९३ ५.३ | काश्यप, मकर, श्रवण, ४ थे अंत्य,देव | | नोकरी + व्यवसाय | वा.प्रा. ६ लाख | डॉ. सुनिल देशपांडे मु.पो.दाटे, ता. चंदगड. ९४२१२८९५६८ |
| ५. | श्रीपाद AB +ve | देशस्थ | ११/६/९३ ५.६ | हरीत, कुंभ पूर्वाभाद्रपदा, १ले आद्य, मनुष्य | B.E. (Mech.) | बेंगलोर येथे नोकरी | मा.प्रा. ६०,०००/- | श्रीमती मीना रा. दड्डीकर दातार बोळ, शिवाजी पेठ, कोल्हापूर.९४२११०७३४१ |
| ६. | ओंकार --- | देशस्थ | ३/२/९४ ५.७ | काश्यप, तूळ स्वाती, ४ थे अंत्य, देव | B.E. Civil M.Tech. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ६ लाख | शशिकांत माधव देशपांडे राजारामपुरी ११ वी गल्ली, कोल्हापूर. ९८५०८२३६२० |
| ७. | परिमल O +ve | देशस्थ | १०/२/९४ ५.११ | शांडिल्य, मकर, श्रवण, ४थे अंत्य, देव | ITI | आयुर्वेदिक मेडिसीन डिस्ट्री. रत्नागिरी | मा.प्रा. १५ ते २० हजार | प्रसाद सुधाकर कुलकर्णी खेडशी, रत्नागिरी. ८२७५७२२१५४५ |
| ८. | रामकृष्ण A + ve | देशस्थ | १२/७/९५ ५.८ | भारद्वाज, धनू उत्तराषाढा, १ ले अंत्य, मनुष्य | B.E. (Mech) | कोल्हापूर येथे नोकरी | मा.प्रा. ४३,५००/* | गजानन नारायण मुनीश्वर बिनखांबी गणेश मंदिर, कोल्हापूर.९८८१२२२३८४ |
| ९. | आशिष A +ve | कोकणस्थ | ४/१/९६ ६.०० | शांडिल्य, वृषभ मृगशीर्ष, २ रे मध्य, देव | B.E. (Elect) | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. १२ लाख | जगदीश सोमण नारायण पेठ, पुणे. ९३२२०६८६६२ |
| १०. | गौतम O +ve | देशस्थ | २९/३/९६ ५.११ | काश्यप, कर्क पुष्य, ३ रे मध्य, देव | M.Tech. | नोकरी | वा.प्रा. ५ लाख | कल्याण कुलकर्णी बळवंत नगर, कोल्हापूर ८३७८९९३४९४ |

**मयुरेश गजानन कुलकर्णी**

**शिक्षण :** MBA (Finance & IT)

**देशस्थ** (B +ve)

**जन्मतारीख :** ११/५/१९९१

**नोकरी :** भारतीय पोस्ट ऑफिस कोल्हापूर.

**मा.प्रा. :** ३५,०००/- **उंची :** ५.८

**पत्ता : मिनल गजानन कुलकर्णी**
सोमवार पेठ, कराड.
मोबा. 9890700737, 9637194014

**अपेक्षा :** पदवीधर, शक्यतो नोकरी असावी.

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| भारद्वाज | मीन | रेवती | २ रे | अंत्य | देव |

**प्रथमेश प्रदिप बादरायणी**

**शिक्षण :** BCA, MCA

**देशस्थ** (AB +ve)

**जन्मतारीख :** ४/६/१९९७

**नोकरी :** TCS पुणे येथे

**वा.प्रा. :** ७ लाख **उंची :** ५.४

**पत्ता : श्री. प्रदिप बादरायणी**
**पुणे.** मोबा. 9890865857

**अपेक्षा :** अनुरूप

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| वसिष्ठ | वृषभ | कृतिका | ४ थे | अंत्य | राक्षस |

## कोल्हापूर चित्पावन संघाच्या वतीने

# श्री अंबेश्वर माध्यमिक विद्यालयाला शैक्षणिक मदत





श्री अंबेश्वर माध्यमिक विद्यालयातर्फे कोल्हापूर चित्पावन संघाचे अध्यक्ष श्री. नंदकुमार मराठे व उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे यांचा सत्कार करण्यात आला.



मुलांना खाऊ वाटप करताना सौ. रेखा जोशी, सौ. पंकजा गोरे, सौ. माधुरी करंदीकर व सौ. किनरी शहा




विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि शिक्षकांसमवेत संघाचे पदाधिकारी आणि प्रतिथयश बांधकाम व्यावसायिक श्री. प्रकाश पत्की, श्री. हसमुखभाई शहा व श्री. हेमांग शहा

## मुखपृष्ठ कथा

# ‘विक्रांत’ वरील विराट वक्तृत्व !

INS विक्रांत ही संपूर्ण स्वदेशी बनवटीची विमानवाहू युद्धनौका देशाला समर्पित करण्याचा कार्यक्रम अतिशय देखणा होता. आणि या देखणेपणाला साजेसं मोदीजींचं संबोधन होतं. निश्चितच मोदीजींच्या अनेक संस्मरणीय भाषणापैकी एक ! त्यांच्यासमोर कागदही नव्हता आणि टेलिप्रॉम्पटरही ! त्यांच्या शब्दात नेहमीच अनुप्रास असतो.. पण तो ओढूनताणून आणल्यासारखा कधीच वाटत नाही... ‘विक्रांत’साठी त्यांनी वापरलेली विशेषणं सुरेख होती... विक्रांत विशाल हैं, विराट हैं, विहंगम हैं, विशिष्ट हैं, विशेष हैं... विक्रांत केवल ‘युद्धपोत’ नहीं हैं... ये इक्कीसवी सदीके भारतके परिश्रम, प्रतिभा, प्रभाव और प्रतिबद्धता का प्रमाण हैं... आजादी के अमृत महोत्सवका अतुलनीय अमृत हैं विक्रांत! आजच्या भाषणातला मोदींचा जोष एखाद्या युवकासारखा होता.

यदि लक्ष्य दुरंत हैं... यात्राए दिगंत हैं... समदंर और चुनौतियाँ अनंत हैं... तो भारतका उत्तर हैं विक्रांत! हे म्हणताना ‘विक्रांत’ शब्दावर त्यांनी आवळलेली मूठ कायम लक्षात राहणारी! आपल्या संस्कृत साहित्यात नौका व जहाजं यांची नावं किती विपुलतेनं येतात हे सांगताना ‘तरणीलोला, दीर्घिका, गत्वरा, गामिनी, जंगाला, प्लाविनी, धारिणी, वेगिनी’ अशी नावं त्यांनी लीलया उच्चारली. मोदीजींचे संदर्भ सहसा सुटत नाहीत.. विक्रांतच्या निर्मितीसाठी त्यांनी शास्त्रज्ञ, अभियंते यांच्यासोबत ‘सर्व श्रमिक बंधू भगिनींचंही’ अभिनंदन केलं.. सर्वांना ‘ओणम’च्या पवित्र पर्वाच्या शुभेच्छाही दिल्या.. नौदलाचा नवीन ध्वज त्यांनी ‘वीर छत्रपती शिवाजी महाराजांना’ समर्पित केला. हा ध्वज म्हणजे भारताच्या प्रदीर्घ सांस्कृतिक परंपरेचा उत्तम ल.सा.वि आहे. उपनिषदातलं ‘शं नो वरुण:’ हे वाक्य त्यावर अंकित आहे. (वरुण आमच्यासाठी शुभ असू दे.) अष्टकोनी आकारात निळ्या पार्श्वभूमीवर सोनेरी रंगात अशोकस्तंभ आहे. हा अष्टकोनी आकार शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेनुसार आहे. त्याची दुहेरी सोनेरी किनारही महाराजांच्या राजमुद्रेप्रमाणेच आहे. डाव्या कोपऱ्यात तिरंगा ध्वज आहे. उपनिषद काळाचा आधुनिक काळाशी संगम घडवणारा असा हा ध्वज!! INS विक्रांतला यशासाठी हार्दिक शुभेच्छा!

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024

# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**

ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO

C-DOT

R.D.S.O.




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :**
info@shogini.com

**Visit us at :**
www.shogini.com

**PRINTED BOOK**

प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी
मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल,
गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.